साप्ताहिक
# विश्वनायक
Email: vishvanayak94@gmail.com
● संपादक : बिलाल शेख ● VISHVANAYAK Mo.8686888898

■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - ३५ ■ मंगळवार दि.२५ ऑगस्ट २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 35 ■ Tuesday Dt. 25 August 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

## शेतकरी व नागरिकांच्या कामांकडे दुर्लक्ष : भागवत गीत्ते

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**



परळी ग्रामीण तलाठी सज्जाचा तात्काळ बदल करण्यात यावा, अशी मागणी मलकापूर येथील भागवत रामकिशन गित्ते यांनी उपविभागीय अधिकारी, परळी वैजनाथ यांच्याकडे दिनांक १३ ऑगस्ट २०२६ रोजी लेखी अर्जाद्वारे केली आहे. अर्जात नमूद केल्यानुसार, परळी ग्रामीण तलाठी सज्जाचा कार्यभार तलाठी प्रतीक्षा बसापुरे या मागील सुमारे दोन वर्षांपासून सांभाळत आहेत. मात्र, या कालावधीत शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरिकांची कामे अपेक्षित पद्धतीने होत नसल्याचा आरोप अर्जदाराने केला आहे.

तलाठी सज्जाचा कारभार त्यांच्या हाताखालील व्यक्तींच्या माध्यमातून चालविला जात असल्याचा दावाही अर्जात करण्यात आला आहे. तसेच, परळी ग्रामीण परिसरातील रस्त्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये इतर व्यक्तींकडून पंचनामे तयार करून घेण्यात आले असून, काही नोंदी चुकीच्या पद्धतीने दाखल करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय, तलाठी कार्यालयाशी संबंधित कामांसाठी त्यांच्या हाताखालील व्यक्तींकडून मनमानी पद्धतीने पैशांची मागणी केली जात असल्याचेही अर्जदाराने म्हटले आहे. त्यामुळे शेतकरी व नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा दावा करण्यात आला आहे. या सर्व तक्रारींची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी आणि परळी ग्रामीण तलाठी सज्जाचा तात्काळ बदल करावा, अशी मागणी भागवत रामकिशन गित्ते यांनी केली आहे.

# बीडमध्ये वाहतूक पोलिसांचा अंधेर नगरी न्याय; भंगार बसमागे ‘अर्थकारण’ तर चौकात ५ हजारांचा ‘वशीला’?

## छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अतिक्रमणकर्ते वाहतूक पोलिसांचे ‘जावई’ आहेत का? नागरिकांचा संतप्त सवाल!

### गेवराई महामार्गावर वसुली करणारा ‘बकासुर’ कोण? बीड वाहतूक पोलिसांच्या मनमानी कारभाराने अब्रू वेशीवर!

### सर्वसामान्यांवर दंडुकशाही अन् चौकातील अतिक्रमणधारकांना अभय; बीड वाहतूक विभागाचा भ्रष्ट कारभार चव्हाट्यावर!



### पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेबांकडे कठोर कारवाईची मागणी

या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी तात्काळ उच्चस्तरीय सखोल चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. गेवराई महामार्गावरील वसुलीबाज आणि शहरातील हप्ता वसुली करणाऱ्यांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करून बीड पोलिसांची डागळलेली प्रतिमा सावरण्याची गरज निर्माण झाली आहे. सत्य काय ते चौकशीनंतर समोर येईलच, परंतु तोपर्यंत सर्वसामान्यांवर होणारा अन्याय थांबणार का? याकडे संपूर्ण बीडकरांचे लक्ष लागले आहे.







**बीड / जगमित्र न्यूज**

शहरात वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असलेल्या बीड शहर वाहतूक शाखा सध्या भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकली आहे. चिमुकल्यांचा जीव धोक्यात घालणाऱ्या शाळांच्या भंगार बसेसवर केवळ दिखावा म्हणून कारवाई करत त्यांना मुदत देणे, तर दुसरीकडे सामान्य हातगाडीधारकांवर बडगा उगारून छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि बसस्थानक परिसरात महामार्गावर अतिक्रमण करणाऱ्या टपऱ्या व चारचाकी खाद्य व्यावसायिकांकडून प्रतिमहिना ५,००० रुपयांचा ‘वशीला’ (हप्ता) वसुलीचा गंभीर आरोप केला जात आहे. या मनमानी कारभारामुळे पोलीस विभागाची प्रतिमा बीडमध्ये पूर्णपणे मलिन होत असून, नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. काही दिवसांपूर्वी वाहतूक पोलिसांनी मिल्लिया शाळेच्या कालबाह्य आणि भंगार स्कूल बसेसवर कारवाईचा बडगा उगारला होता. मात्र, निष्पाप विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या या संस्थाचालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची तुघकी भूमिका घेण्याऐवजी, वाहतूक पोलिसांनी त्यांना बसेसला दुरुस्ती आणि कागदपत्रे क्लेयर करण्यासाठी वेळ दिली. यामागे मोठी आर्थिक देवाणघेवाण झाल्याची चर्चा संपूर्ण शहरात रंगली होती. आणि वृत्तपत्रात बातम्या प्रकाशित झाल्या होत्या. त्या जुने भ्रष्टाचाराचे डाग पुसले गेले नाही तर पुन्हा एकदा वाहतूक पोलीस विभागातील अर्थकारणाची पोलखोल केली आहे. एका बाजूला नियमांच्या नावाखाली सर्वसामान्यांना वेठीस धरले जात असताना, गेवराई महामार्गावर जड वाहन चालकांकडून बेकायदेशीर रितीने वसुली करणारा वाहतूक विभागातील नेमका ’बकासुर’ कोण? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या बेकायदेशीर वसुलीमुळे बीड वाहतूक विभागाची अब्रू अक्षरशः वेशीवर टांगली गेली आहे. बीड शहरातील रस्त्याच्या कडेला एखादा गरिबाने पाण्याचा डब्बा किंवा चांभाराने ३ बाय ३ चा प्लास्टिकचा शेड टाकला, तर वाहतूक पोलीस तत्काळ धाव घेऊन जप्ती व कारवाईची भीती दाखवून त्यांचा रोजगार उद्ध्वस्त करतात. मग, हाच नियम छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि बसस्थानक गेट शेजारी लागू का होत नाही?शिवाजी महाराज चौकात १२ ते १३ चारचाकी वाहनांमध्ये (उत्तप्पा आणि डोसा गाड्या) महामार्गावरच खुलेआम अतिक्रमण करून व्यवसाय मांडला आहे. बसस्थानक गेट शेजारी मोठी लट्ठ पानटपरी महामार्गावर थाटली गेली आहे.

हे अतिक्रमण करणारे वाहतूक विभागाचे ’जावई’ आहेत का? असा संतप्त सवाल जनता विचारत आहे. वाहतूक पोलिसांच्या डोळ्यात हे मोठे अतिक्रमण का दिसत नाही? किंवा डोळ्यात कुसळ गेले आहे का? असा रोखठोक सवाल नागरिक विचारत आहेत.

### प्रतिमाह ५ हजार रुपयांचा ’वशीला’ ठरवून दिल्याचा आरोप

**सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या चर्चांनुसार, छत्रपती शिवाजी महाराज चौकातील १२ ते १३ डोसा-उत्तप्पा व्यावसायिकांकडून एका विशिष्ट वाहतूक पोलीस हेडने वशीला लावून प्रतिमहिना ५,००० रुपयांचा ’पॉइंट’ ठरवून दिल्याचा गंभीर आरोप होत आहे. एकाला दंड आणि दुसऱ्याला अभय, असा हा दुजाभाव चव्हाट्यावर आला आहे.**

## वन विभाग यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करूनही न्याय नाही मिळाल्यानंतर आत्मदान करणार : प्रशांत ससाने

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील वन विभाग (प्रादेशिक) कार्यालयातील विभागीय वनाधिकारी यांच्या कार्यकाळात जिल्हा वार्षिक योजना, कॅम्प अंतर्गत कामे, वनपरिक्षेत्रातील विविध कामे, एल.बी.एस. सी.टी. कामे तसेच वन विभागातील खरेदी प्रक्रीयेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी आहेत. तसेच मे २०२६ मध्ये झालेल्या बदल्यांच्या प्रक्रियेत काही वरिष्ठ कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता डावलून कनिष्ठ कर्मचाऱ्यांना संबंधित ठिकाणी बदली/नियुक्ती देण्यात आल्याची तक्रार आहे.

तसेच काही मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना जाणीवपूर्वक डावलण्यात आल्याचा आरोप आहे. सदर बदली प्रक्रियेचेही निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. वन पर्यटन अंतर्गत काही ठिकाणी प्रत्यक्ष कामे न करता अथवा अपूर्ण व निकृष्ट दर्जाची कामे करून बिले अदा करण्यात आल्याच्या तक्रारी आहेत. काही वनपरिक्षेत्रांमध्ये प्रत्यक्ष काम न करताही शासकीय निधीतून बिले उचलण्यात आल्याचे निदर्शनास आल्याची माहिती आहे. तसेच वन विभागातील खरेदी प्रक्रियेमध्ये सन २०२४-२०२५ व २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याची तक्रार असून, संबंधित कामे व खरेदी निकृष्ट दर्जाची किंवा नियमबाह्य पद्धतीने झाल्याचा आरोप आहे. यापूर्वीही या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निवेदन देण्यात आले होते. मात्र अद्यापपर्यंत या प्रकरणाची समाधानकारक चौकशी अथवा ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची तातडीने निष्पक्ष चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. बहुजन विकास मोर्चाच्या वतीने दिनांक २४ ऑगस्ट २०२६ रोजी वन विभाग (प्रादेशिक), बीड येथे आमरण उपोषण चालू आहे.

## प्रसूतीदरम्यानच्या कथित हलगर्जीपणाप्रकरणी दोषींवर फौजदारी कारवाई करा!

### छाया पांचाळ, शेख मुस्कान व संध्या गायकवाड प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांच्या निलंबनाची मागणी; जिल्हा रुग्णालयासमोर आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालयातील माता व बाल रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल होणाऱ्या महिलांच्या उपचारादरम्यान कथित हलगर्जीपणाच्या घटना समोर येत असल्याचा आरोप करत, संबंधित प्रकरणातील दोषी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, तसेच त्यांची वैद्यकीय सनद रद्द करण्याबाबत नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती अधिकार कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली. या मागणीसाठी सोमवारी सकाळी जिल्हा रुग्णालयासमोर निदर्शने करण्यात आली.

छाया गणेश पांचाळ व शेख मुस्कान यांच्या प्रसूतीदरम्यान मृत्यूच्या घटनांसह वडवणी येथील १९ वर्षीय संध्या सुरज गायकवाड यांच्या सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर उद्भवलेल्या कथित गुंतागुंतीची चौकशी



करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. संध्या गायकवाड यांच्या पोटात शस्त्रक्रियेदरम्यान वैद्यकीय साहित्य राहिल्यामुळे संसर्ग झाल्याचा आरोप असून, त्यांच्यावर पुणे येथील ससून रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले. या कथित प्रकरणांमध्ये नेमकी वैद्यकीय जबाबदारी निश्चित करण्यासाठी स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी. दोषी आढळणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायद्यानुसार फौजदारी कारवाई करावी आणि संबंधितांच्या वैद्यकीय परवान्याबाबत सक्षम प्राधिकरणामार्फत नियमानुसार निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

**२४ कोटींच्या माता व बाल रुग्णालयात सुविधांचा प्रश्न**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी यासाठी शासनाने कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. सुमारे २४ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या माता व बाल रुग्णालयातील कथित हलगर्जीपणाच्या घटनांमुळे रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे डॉ. ढवळे

▶ पान २ वर

## बीडमध्ये २६ ऑगस्टला शमा-ए-रिसालतचा अजीमुश्शान जुलूस!

**के.जी.एन. ग्रुप सीरत कमिटीच्या वतीने भव्य आयोजन; दर्गाह हजरत शहंशाहा वली येथून दुपारी १ वाजता होणार जुलूसाला सुरुवात**

**बीड । प्रतिनिधी**



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हजरत मोहम्मद मुस्तफा (स.) यांच्या योमे विलादत (जन्मदिन) निमित्त के.जी.एन. ग्रुप सीरत कमिटी, बीड यांच्या वतीने शमा-ए-रिसालतच्या परवान्यांचा अजीमुश्शान जुलूस (मिरवणूक) आयोजित करण्यात आला आहे. हा भव्य जुलूस (मिरवणूक) दि.२६ ऑगस्ट २०२६ बुधवार रोजी (१२ रब्बीउल अव्वल १४४८ हि.) दुपारी १ वाजता दर्गाह हजरत शहंशाहा वली (रह.) येथून निघणार आहे.

जुलूसाचा मार्ग चांदणी चौक, भोलेबाबा मस्जिद चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, माळीवेस, धोंडीपुरा, बलभीम चौक, कारंजा, जुनी भाजी मंडई, बुंदलपुरा, राजुरीवेस, बशीरगंज असा राहणार आहे. यानंतर बशीरगंज येथे एक तास जुलूसाचा थांबा राहणार असून, त्यानंतर रिपोर्टर ऑफिस (जुने

▶ पान २ वर

## शाळांमधील व्हिडिओ-फोटो बंदीविरोधात सविनय कायदेभंग आंदोलन!

### नाकर्तेपणा लपविण्यासाठी काढलेला आदेश तातडीने रद्द करा : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळांमध्ये बाहेरील व्यक्तींनी शाळेच्या वेळेत व्हिडिओ व फोटो काढण्यास बंदी घालण्याच्या आदेशाविरोधात सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य, डॉ. गणेश ढवळे यांनी सोमवारी लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत जाऊन ‘सविनय कायदेभंग’ आंदोलन केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची प्रतिमा हातात घेऊन डॉ. ढवळे यांनी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधत शाळेतील परिस्थितीचे व्हिडिओ व फोटो काढले. हा आदेश तातडीने रद्द करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री,





उपमुख्यमंत्री, पालकमंत्री बीड तथा शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या माध्यमातून लेखी निवेदनाद्वारे केली.

**नेमका आदेश काय?**

बीड पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी प्रणिता गंगाखेडकर यांनी केंद्रप्रमुखांना दिलेल्या पत्रानुसार, शाळेच्या वेळेत बाहेरील व्यक्तींनी शाळेत उपस्थित राहून व्हिडिओ अथवा फोटो काढण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच अशा प्रकारची कोणतीही परवानगी मुख्याध्यापकांनी देऊ नये, अशा सूचना

▶ पान २ वर

## मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशनचा नवा अध्याय; शेख सद्दाम यांची नेकनुर शहर अध्यक्षपदी नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**



मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशनच्या वतीने नेकनुर येथे शेख सद्दाम भाई यांची नेकनुर शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. नियुक्तीपत्र काझी मुहीब उर रहमान यांच्या माध्यमातून देण्यात आले. संस्थापक अध्यक्ष अरफात खान यांच्या नेतृत्वाखाली हा नियुक्ती सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मौलाना साबेर साहेब होते. यावेळी फाउंडेशनचे सचिव सय्यद सलमान, कोषाध्यक्ष वाजेद मोमिन, राज्य प्रवक्ते मुशीर इनामदार, शेख आयाज, सय्यद शाहबाज यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी नेकनुर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मंगेश सावळे साहेब यांनीही उपस्थित राहून मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. तसेच फाउंडेशनच्या माध्यमातून समाजहितासाठी सुरू असलेल्या कार्याला मोलाचे मार्गदर्शन करत, आगामी काळातही सामाजिक उपक्रमांसाठी सहकार्य व मार्गदर्शन करण्याचा विश्वास व्यक्त केला.

नेकनुर शहराची महत्त्वपूर्ण जबाबदारी शेख सद्दाम भाई यांच्यावर सोपविण्यात आल्याने त्यांच्या नेतृत्वाखाली नेकनुरमध्ये फाउंडेशनचे सामाजिक कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी उपसरपंच सचिन भैया शिंदे, माजी सरपंच राजा भैया, सय्यद सज्जू, शेरू भाई, अबरार भाई, मेंबर मुजीब अत्तार, मेंबर रहीम, मेंबर रिझवान, मेंबर मतीन, मुझावर सर, सलमान नेते, जाहिद पत्रकार, अरबाज पठाण यांच्यासह मान्यवर व नागरिक उपस्थित होते. समाजहितासाठी संघटन, जनतेसाठी संघर्ष आणि हक्कांसाठी आवाज या ध्येयाने मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशनची वाटचाल सुरू असून, नेकनुर शहरातील ही नियुक्ती संघटनेच्या विस्तारातील महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.

## हरिश्चंद्र पिंपरी येथील शेतात बेचाळीस लाख रु चा गांजा जप्त!

### उपविभागीय पोलिस अधिकारी अशोक आनंदे यांची धडक कारवाई; संदीपान विठ्ठल शिंदे यांच्या शेतात १६८ किलो गांजा जप्त केला

**माजलगाव, वडवणी । शेख अखिल**

वडवणी तालुक्यातील हरिचंद्र पिंपरी येथील संदिपान शिंदे यांच्या शेतात बेकायदेशीररीत्या गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, पोलिसांनी कारवाई करत तब्बल २६८ किलो वजनाची गांजाची झाडे जप्त केली. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

हरिश्चंद्र पिंपरी येथील गट क्रमांक १५८ मधील शेतात गांजाची झाडे लावण्यात आल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. सदर शेत संदीपान विठ्ठल शिंदे, रा. हरिश्चंद्र पिंपरी, ता. वडवणी, जि. बीड यांच्या मालकीचे असल्याचे पोलिसांनी सांगितले.

कारवाईदरम्यान गांजाची झाडे जप्त करण्यात आली असून त्यांचे एकूण बजन २६८ किलो असल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई श्रीमती चेतना यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव अशोक आनंदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. कारवाईमध्ये वडवणी पोलीस ठाण्याच्या सपोनि वर्षा व्हगाडे, पोलीस उपनिरीक्षक श्याम गायकवाड, पोलीस हवालदार उबाळे, राऊत, पोलीस अंमलदार काकडे, कप्पे, मुंजाळ, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय माजलगाव येथील पोलीस हवालदार संदीप मोरे, पोलीस हवालदार नामदास यांच्यासह वडवणी तहसील कार्यालयातील तलाठी, पंच आदीचा सहभाग होता. दरम्यान, जप्त केलेल्या गांजाबाबत पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलिसांकडून सुरू आहे. या कारवाईमुळे अवैध गांजा लागवडीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलल्याचे स्पष्ट झाले आहे.

अनेक वर्षांपासून गांजाची लागवड सुरू असल्याची माहिती गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू. या प्रकरणात पोलिसांकडून जप्त मुद्देमालाचा पंचनामा व इतर कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती आहे. पुढील तपासात गांजाची लागवड, त्यामागील उद्देश आणि संभाव्य नेटवर्क याबाबत अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध गांजा लागवडीला आळा घालण्यासाठी ग्रामीण भागातही पोलिसांचे लक्ष असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणातील पुढील तपासाकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

## जिल्हाधिकारी साहेब, आपण कलावंतांवर आत्मदहनाची वेळ आणली!

**बीड जिल्ह्यातील कलाकार तीन वर्षांपासून मानधनापासून वंचित**

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या तीन वर्षांपासून बीड जिल्ह्यातील कलावंत राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेतून मिळणाऱ्या लाभापासून वंचित असल्याने कलावंतांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, सांस्कृतिक कार्यमंत्री, अर्थमंत्री, पालकमंत्री आणि विभागीय आयुक्त यांना पाठविलेल्या निवेदनातून येत्या आठ ते दहा दिवसात समितीची मीटिंग घेऊन मानधन वाटप





करावे अन्यथा पुढील महिन्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कलावंत मंडळी सामूहिक आत्मदहन करणार असल्याचा इशारा देण्यात आल्याने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी कलावंतांवर आत्मदहन करण्याची वेळ आणल्याची एकच चर्चा जिल्हाभरात होऊ लागली आहे.

बीड जिल्ह्यात गेल्या तीन वर्षांपासून राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेच्या लाभार्थींना लाभ मिळत नाहीये तसेच कलाकार निवड समितीची बैठक सुद्धा अध्यक्ष असलेले जिल्हाधिकारी आणि सचिव सदस्य असलेले उपमुख्य कार्यकारी अधिकारी तसेच सदस्य असलेले मुख्य कार्यकारी अधिकारी घेत नसल्याने गेल्या तीन वर्षांपासून बीड जिल्ह्यातील कलावंत लाभापासून वंचित आहेत.

अनेक वयोवृद्ध व ज्येष्ठ कलावंतांवर उपासमारीची वेळ सुद्धा आलेली आहे. अशा कलाकारांमध्ये पुरुष कलाकारांसह महिला कलाकारांचा ही समावेश आहे. तसेच अनेक ज्येष्ठ महिला कलावंत या विधवा आहेत. तर अनेक पुरुष ज्येष्ठ कलाकार आपला उदरनिर्वाह बुडत्याला काडीचा आधार प्रमाणे या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या मानधनावर चालवितात. गेल्या तीन वर्षांपासून या योजनेसाठी गठीत केलेल्या समितीची सर्वसाधारण बैठक सुद्धा जिल्हाधिकारी यांनी अजून पर्यंत घेतलेली नाही. यामुळे शासनाकडून कलावंतांसाठी दरवर्षी येणारे कोट्यावधी

▶ पान २ वर

## संपादकीय

# स्त्री शक्तीचा आवाज

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आणि देशातील प्रमुख शैक्षणिक केंद्र असलेल्या पुणे शहरामध्ये काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'छात्रों की गुंज' या कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांशी जो संवाद साधला तो निश्चितच लक्षणीय मानावा लागेल. आणखी काही तासांनीच साजर्‍या होणाऱ्या राखी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी अत्यंत चाणाक्षपणे हा विषय निवडला आणि महिलांच्या मनातील भावनांना एक वेगळे व्यासपीठ उपलब्ध करून दिले, त्याबद्दल त्यांचे निश्चितच अभिनंदन करावे लागेल. राहुल गांधी यांच्या या कार्यक्रम मालिकेचे नाव जरी 'छात्रों की गुंज' असे असले तरी पुण्यातील कार्यक्रमामध्ये मात्र 'हजारो बहनों की गुंज' देशातील लाखो, कोट्यवधी लोकांना ऐकता आली. राहुल गांधी यांच्या या कार्यक्रमावर अपेक्षेप्रमाणे सत्ताधारी भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षाकडून टीका झाली असली तरी आणि भविष्यातही अशा प्रकारची टीका होणार असली तरी ज्या प्रकारे राहुल गांधी यांनी पुण्यातील या कार्यक्रमाला राजकारणविरहित स्वरूप दिले होते ते निश्चित महत्त्वाचे आहे. सर्वसाधारणपणे कोणत्याही राजकीय व्यासपीठावर राहुल गांधी उघडपणे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यावर टीका करत असतात. पण पुण्यातील या कार्यक्रमामध्ये त्यांनी कोणत्याही सत्ताधारी पक्षाच्या नेत्याचे नाव घेतले नाही. एवढेच नाही तर व्यासपीठावर ज्या मुली संवादासाठी येत होत्या त्या मुली क्वचित जर राजकारणाकडे वळत असतील तर त्यांनी त्यांना तसे वळवू दिले नाही. आपल्याला राजकारण विरहित महिलांच्या विषयावर बोलायचे आहे हे त्यांनी ठामपणे सांगितले. भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशामध्ये सर्वच राजकीय पक्षांचे नेते कायमच निवडणूक जिंकण्याच्या आणि लढवण्याच्या मूडमध्ये असताना आणि कायमच एकमेकांवर विखारी टीका करण्याच्या पवित्र्यात असताना राहुल गांधी यांनी सुरू केलेली संवादाची ही प्रक्रिया निश्चित महत्त्वाची आहे. राहुल गांधी यांच्या या कार्यक्रमापूर्वी भारतीय जनता पक्षाने या कार्यक्रमावर नौटंकी अशी टीका केली होती. पण राहुल गांधी (ठरहींश ॠरपवहळ) यांच्या या संवादाच्या कार्यक्रमानंतर त्यांच्यावर टीका करणारे आपोआपच तोंडघशी पडले आहेत. गेल्याच महिन्यामध्ये राजधानीत जंतर-मंतर येथे जेन झी आंदोलन गाजले होते. त्यापूर्वीच राहुल गांधी यांनी 'छात्रों की गुंज' हा कार्यक्रम जरी सुरू केला असला तरी पुण्यातील कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांनी लोकसंख्येतील प्रमुख घटक असलेल्या महिलांना प्राधान्य दिले हे अत्यंत महत्त्वाचे आहे. राहुल गांधी यांच्या या व्यासपीठावर महिलांनी खुलेपणाने आपले विचार व्यक्त केले. यानिमित्ताने देशातील महिलांना कोणत्या समस्या जाणवतात, त्याचे प्रातिनिधिक स्वरूपही समोर आले. महिलांनी व्यक्त केलेल्या समस्यांनंतर ओघानेच राहुल गांधी यांनी मनुस्मृतीवर टीका केली आणि मनुस्मृतीमध्ये महिलांना दडपण्याची मानसिकता असल्याने महिलांनी पिंजरा तोडून बाहेर येण्याची गरज असल्याचेही स्पष्ट केले. अर्थात मनुस्मृती केवळ प्रातिनिधिक ग्रंथ मानावा लागेल. भारतीय संस्कृतीमध्ये जे धर्म किंवा पंथ अस्तित्वात आहेत त्यापैकी अनेक धर्मांमध्ये आणि पंथांमध्ये महिलांवर बंधने घालणारी अशी अनेक पुस्तके किंवा नियमही कार्यरत असतात. साहजिकच महिलांनी केवळ मनुस्मृतीच्या मानसिकतेतून बाहेर यावे असे नाही तर, महिलांवर बंधने घालणाऱ्या एकूण तालिबानी पुरुषी मानसिकतेतूनच बाहेर यावे असेच राहुल गांधी यांना सुचवायचे आहे. एखाद्या राजकीय पक्षाने किंवा त्याच्या प्रमुख नेत्याने आपले राजकारण बाजूला ठेवून एखाद्या महत्त्वाच्या विषयाला किती प्राधान्य द्यावे, याचे आदर्श उदाहरण म्हणूनच या संवाद प्रक्रियेकडे पहावे लागेल. अप्रत्यक्षपणे राहुल गांधी यांनी या सर्व संवादाच्या माध्यमातून सत्ताधारी पक्षावर निशाणा साधला असला तरी त्यातून योग्य बोध घेण्याचे काम सत्ताधारी पक्षाला करावेच लागणार आहे. देशातील महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण कमी होताना दिसत नाही. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांचा लैंगिक छळही कायम आहे. महिलांना नेहमीच भेदभावाची वागणूक दिली जात आहे. या कार्यक्रमात राहुल गांधी यांनी सादर केलेल्या आकडेवारीप्रमाणे देशातील ८०% महिलांना कधी ना कधी छळवणुकीला सामोरे जावे लागत आहे.तालिबानी प्रवृत्तीच्या आणि पुरुषी मानसिकतेच्या दडपणामुळे या छळाची तीव्रता वाढत आहे हे उघड आहे. साहजिकच जंतर-मंतरवरील कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनानंतर केंद्रातील सत्ताधारी पक्षाने जेन झी म्हणजे तरुण पिढीकडे लक्ष देण्यास सुरुवात केली असेल तर, आता राहुल गांधी यांच्या पुण्यातील संवादानंतर सत्ताधारी पक्षाने विशेषतः केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने बहिणींची ही गुंज गांभीर्याने घ्यायला हवी. भारतीय लोकसंख्येचा अर्ध्यापेक्षा जास्त हिस्सा असलेल्या महिला अद्यापही समस्या मुक्त नाहीत याची जाणीव राहुल गांधी यांच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने करून देण्यात आली आहे. साहजिकच आता राहुल गांधी यांनी अधोरेखित केलेल्या महिलांच्या समस्या सोडवण्याकडे केंद्र सरकारने प्राधान्याने लक्ष द्यायला हवे.

# एन.एस.एल. शुगरच्या नव्या बॉयलरविरोधात ग्रामस्थांचा एल्गार!

## ना. सुनेत्राताई पवार व ना. पंकजाताई मुंडे यांनी कारवाई करण्याची मागणी; घरांपासून अवघ्या १००–१५० फुटांवर बांधकामाचा आरोप; प्रदूषणाने आरोग्य, शेती व पाणी धोक्यात असल्याचा दावा

**बीड, माजलगाव । प्रतिनिधी**

एन.एस.एल. शुगर युनिट-३, पवारवाडी येथील प्रस्तावित नव्या बॉयलरच्या बांधकामा विरोधात हनुमान नगर, निपाणी टाकळी व परिसरातील ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. आवश्यक परवानग्या घेतल्या आहेत का, ग्रामपंचायतीची नाहरकत आहे का आणि प्रदूषण नियंत्रणाच्या नियमांचे पालन होत आहे का? असे थेट सवाल उपस्थित करत ग्रामस्थांनी उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे धाव घेतली आहे.

ग्रामस्थांच्या आरोपानुसार, प्रस्तावित बॉयलरचे बांधकाम रहिवासी घरे, हॉटेल व्यवसाय आणि शेतीपासून अवघ्या १०० ते १५० फुटांवर सुरू आहे. एवढ्या कमी अंतरावर उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पामुळे भविष्यात नागरिकांच्या आरोग्यावर तसेच शेती व व्यवसायावर गंभीर परिणाम होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. यापूर्वीही कारखान्याच्या बॉयलरमधून निघणारी काजळी, भुसा आणि धूळ परिसरातील घरे, झाडे, शेती, हॉटेल, कपडे व अन्नपदार्थांवर पडत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. धूळ व काजळीमुळे डोळ्यांच्या समस्यांसह नागरिकांना विविध त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जुना प्रदूषणाचा त्रास कमी होत नाही, तोच नवा बॉयलर उभारून आणखी संकट निर्माण केले जात आहे, अशी संतप्त भावना परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



कारखान्यातून सोडण्यात येणाऱ्या रासायनिक मिश्रित सांडपाण्यामुळे परिसरातील विहिरी आणि बोअरचे पाणी दूषित होत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या पाण्याचा शेतीसाठी वापर केल्याने पिकांचे नुकसान होत असल्याचे तसेच दुर्गंधीमुळे शेती करणेही त्रासदायक झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. जनावरांच्या आरोग्यावरही परिणाम होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

नव्या बॉयलरच्या बांधकामासाठी कारखान्याला ग्रामपंचायतीने नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे का, याबाबत ग्रामस्थांनी २३ जुलै २०२६ रोजी ग्रामपंचायतीकडे लेखी अर्ज करून माहिती मागितली होती. त्यावर २९ जुलै रोजी ग्रामपंचायतीने नाहरकत दिलेली नसल्याचे कळविले, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीची नाहरकत नसताना बांधकाम कोणत्या परवानगीच्या आधारे सुरू आहे? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. प्रस्तावित बॉयलरच्या बांधकामाबाबत उपप्रादेशिक प्रदूषण नियंत्रण मंडळ, जालना कार्यालयाकडेही लेखी तक्रार करण्यात आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. मात्र अद्याप अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.नव्या बॉयलरचे बांधकाम तातडीने थांबवावे, संबंधित सर्व परवानग्या व कागदपत्रांची तपासणी करावी, प्रदूषणाबाबत स्वतंत्र चौकशी करावी आणि प्रदूषणामुळे नुकसान झाले असल्यास संबंधितांना नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

या प्रकरणी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना स्वातंत्र्यदिनी लेखी निवेदन बाळासाहेब सोनटक्के (पोलीस बॉईज असोसिएशन तालुका अध्यक्ष, धारूर) व हारीषचंद्र जाधव पोलिस बॉईज असोसिएशन माजलगाव तालुका अध्यक्ष रविंद्र किसन आडे (रा. हनुमान नगर, निपाणी टाकळी, राजू इस्माईल सय्यद, लक्ष्मण सर्जेराव चव्हाण (उपसरपंच, ग्रा.पं. निपाणी टाकळी), भिष्मा वचिष्ठ भोसले, अशोक भगवान सपकाळ यांनी दिले आहे. यांसह परिसरातील शेतकरी, नागरिकांनी अनेक वेळा विविध विभागांच्या अधिकाऱ्यांकडे लेखी अर्ज व तक्रारी करून पाठपुरावा करत असल्याचे सांगितले आहे. तक्रारी, निवेदने आणि पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसेल तर प्रशासन नेमके कोणाची वाट पाहत आहे? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. आता या प्रकरणाकडे प्रशासन किती गांभीर्याने पाहते, प्रस्तावित बॉयलरला आवश्यक सर्व कायदेशीर व पर्यावरणीय परवानग्या आहेत का आणि ग्रामस्थांच्या आरोपांची चौकशी कधी होणार, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अतिक्रमणाच्या नावाखाली गरीबांवरच कारवाई का?

## हातगाडी, भाजी, मच्छी विक्रेते आणि रुग्णालयासमोरील गाड्यांना वाचवा : सलीम अध्यक्ष

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात अतिक्रमण हटाव मोहिमेच्या नावाखाली प्रशासनाकडून सुरू असलेल्या कारवाईत केवळ गरीब आणि छोटे व्यवसायिकांनाच लक्ष्य केले जात असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते सलीम अध्यक्ष यांनी केला आहे. सलीम अध्यक्ष म्हणाले की, प्रशासन हातोडा आणि बुलडोझर घेऊन हातगाडी व्यावसायिक, भाजी विक्रेते, फळ विक्रेते आणि मच्छी विक्रेत्यांच्या गाड्या तोडत आहे. हजार-पाचशे रुपयांसाठी हे लोक पावसात भिजून, उन्हात तापून दिवसभर राबतात. पहाटे ४ वाजता मार्केटमधून भाजी-फळ आणून रात्री ८ वाजेपर्यंत विक्री करतात. तेव्हाच त्यांच्या घरची चूल पेटते. मग त्यांच्या हातगाड्या तोडणे म्हणजे त्यांच्या लहान मुलांच्या तोंडचा घास हिसकावणे आहे.



त्यांनी विशेषतः बीड जिल्हा रुग्णालयासमोरील परिस्थितीकडे लक्ष वेधले. ते म्हणाले, जिल्हा रुग्णालयात रोज हजारो गोरगरीब रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपचारासाठी येतात. मोठ्या हॉटेलमध्ये जाणे त्यांना परवडत नाही. अशा वेळी रुग्णालयासमोरील छोटे चहाचे गाडे, नाश्त्याचे गाडे हेच त्यांचा एकमेव आधार आहेत. तिथे त्यांना स्वस्तात गरम दूध, गरम पाणी आणि जेवण मिळते. अशा गाड्या हटवल्या तर ते रुग्ण आणि नातेवाईक कुठे जातील? ही कारवाई म्हणजे हजारो रुग्णांच्या पोटावर लाथ मारण्यासारखी आहे.

दुजाभाव का?

सलीम अध्यक्ष यांनी सवाल केला की, शहरातील अनेक श्रीमंत लोकांचे १०-१५ फूट कॉम्प्लेक्स आणि घरे रस्त्यावर आलेली आहेत. ज्यांच्या इमारतीला खाली पार्किंग नाही. व्हीआयपी लोकांच्या मोठ्या गाड्या तासनतास रस्ता अडवतात. त्यांच्यावर कारवाई का होत नाही? फक्त गरीब भाजी, मच्छी, फळ आणि हातगाडी वाल्यांवरच अन्याय का होतो?

सलीम अध्यक्ष यांनी प्रशासनाला ३ मागण्या केल्या आहेत. जिल्हा रुग्णालयासमोरील आणि शहरातील सर्व छोटे व्यवसायिकांवरील कारवाई तात्काळ थांबवावी., प्रथम मोठ्या अतिक्रमणांवर आणि व्हीआयपी गाड्यांवर कारवाई करावी., गरीब व्यवसायिकांसाठी पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी. आम्ही अतिक्रमणाच्या विरोधात आहोत, पण कारवाई सर्वांसाठी सारखी असावी. गरिबांनी हा जुलूम आणखी किती दिवस सहन करायचा? असा सवाल सलीम अध्यक्ष यांना शेवटी केला.

# बाजीराव दादांच्या पुढाकारातून गरिबांच्या हृदयाला नवी आशा; पहिला टप्पा शस्त्रक्रियेसाठी ज्युपिटरकडे रवाना

**बीड । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब आणि ज्ञानविजय बाजीराव चव्हाण यांच्या संयुक्त वाढदिवसानिमित्त १५ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या २-डी इको तपासणी व हृदय शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरातून तपासणी करण्यात आलेल्या रुग्णांपैकी पहिला टप्पा आता हृदय शस्त्रक्रियेसाठी ठाणे येथील ज्युपिटर हॉस्पिटलकडे रवाना करण्यात आला आहे. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आर्थिक परिस्थितीअभावी अनेक गोरगरीब कुटुंबांना हृदयविकारासारख्या गंभीर आजारांकडे दुर्लक्ष करावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन बाजीराव दादा चव्हाण यांनी गरजू रुग्णांना वेळेत तपासणी, उपचार आणि शस्त्रक्रियेची सुविधा मिळावी, यासाठी पुढाकार घेतला.



१५ ऑगस्ट रोजी झालेल्या शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेत २-डी इको तपासणी करून घेतली. तपासणीनंतर हृदय शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांची पुढील उपचारासाठी निवड करण्यात आली. शिबिरानंतर अवघ्या सात दिवसांतच पहिल्या टप्प्यातील रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी ज्युपिटर हॉस्पिटल, ठाणे येथे पाठविण्यात आले आहे. तपासणीपासून रुग्णांना ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये नेण्यापर्यंत तसेच रुग्णांची शस्त्रक्रिया करून घरी सोडण्याचे काम हे बाजीराव दादा चव्हाण यांची सर्व टीम करत आहे. या मोफत आरोग्य शिबिरामधील पहिला त्यातील रुग्ण आता शस्त्रक्रियेसाठी जुपिटर हॉस्पिटल कडे पाठवण्यात आले आहे. रुग्णांची शस्त्रक्रिया ही मोफत होणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

तपासणीपासून शस्त्रक्रियेपर्यंत' गरजू रुग्णांना आधार देण्याचा हा उपक्रम केवळ एक आरोग्य शिबिर न राहता अनेक कुटुंबांसाठी आशेचा किरण ठरत आहे. बाजीराव दादा चव्हाण यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या सेवाभावी उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. गोरगरीब रुग्णांच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलावे आणि कोणतेही मूल अथवा गरजू व्यक्ती आर्थिक अडचणीमुळे हृदय उपचारांपासून वंचित राहू नये, या उद्देशाने पुढील टप्प्यातील रुग्णांनाही आवश्यक उपचारांसाठी पाठविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

# पात्रुडच्या महामार्गावरील अतिक्रमणांमुळे अपघातांचा धोका वाढला : अन्वर सय्यद

**माजलगाव । शेख अखिल**

माजलगावपासून अवघ्या सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या पात्रुड गावातून जाणाऱ्या शेगाव-पंढरपूर पालखी मार्गावरील राष्ट्रीय महामार्गावर दिवसेंदिवस वाढत असलेली अतिक्रमणे आणि महामार्गाच्या दुभाजकावरील संरक्षक जाळीची चोरी यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महामार्गालगत झालेल्या अतिक्रमणांमुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत असून, वाहनचालकांना अचानक मार्ग बदलावा लागत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे प्रशासनाने आता केवळ अतिक्रमणाकडे दुर्लक्ष न करता नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षेचा प्रश्न म्हणून या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहावे अशी मागणी होत आहे.

रिपब्लिकन सेनेचे माजलगाव युवा तालुकाध्यक्ष अन्वर सय्यद यांनी तहसीलदार, माजलगाव यांच्याकडे निवेदन सादर करून पात्रुड येथील राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे तातडीने हटविण्याची तसेच संरक्षक जाळी चोरीप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पात्रुड गावातून जाणारा हा महामार्ग सतत वर्दळीचा असून या मार्गावरून मोठ्या प्रमाणात दुचाकी, चारचाकी, अवजड वाहने तसेच प्रवासी वाहतूक सुरू असते. मात्र महामार्गाच्या हद्दीतच विविध प्रकारची अतिक्रमणे वाढत असल्याने रस्त्यालगतचा सुरक्षित परिसर कमी होत आहे. काही ठिकाणी अतिक्रमित जागा भाडेतत्त्वावर देऊन आर्थिक वसुली केली जात असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. रस्त्यालगत अतिक्रमण वाढल्याने वाहनचालकांना सुरक्षित अंतर राखणे, वळण घेताना दृष्यमानता मिळणे आणि पादचाऱ्यांना रस्ता ओलांडणे यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत.



विशेषतः रात्रीच्या वेळी अतिक्रमणे, वाहनांची गर्दी आणि अपुऱ्या सुरक्षाव्यवस्थेमुळे परिस्थिती अधिक धोकादायक बनत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या महामार्गावरील खराब रस्त्या मुळे होत असलेल्या अपघातांची मालिका रोखण्यासाठी प्रशासनाने जागे व्हावे. महामार्गावरील अपघात ही केवळ वाहतूक व्यवस्थेची समस्या नसून ती थेट नागरिकांच्या जीविताशी संबंधित बाब आहे. एखाद्या कुटुंबातील व्यक्ती महामार्गावरील अपघातात जखमी झाली किंवा जीव गमावला तर त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो. त्यामुळे अपघात झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा अपघात होण्यापूर्वीच धोकादायक ठिकाणे शोधून त्यावर प्रतिबंधात्मक उपाय करणे गरजेचे आहे. पात्रुड परिसरातील अतिक्रमणांमुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने एखाद्या मोठ्या अपघाताची वाट न पाहता महामार्गाची तातडीने पाहणी करून धोकादायक अतिक्रमणे हटवावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

संरक्षक जाळी चोरीमुळे सुरक्षेचा प्रश्न महामार्गाच्या दुभाजकावर वाहनांच्या सुरक्षिततेसाठी बसविण्यात आलेली संरक्षक जाळी अज्ञात व्यक्तींनी चोरी केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. ही जाळी केवळ लोखंडी साहित्य नसून महामार्गावरील वाहतुकीच्या सुरक्षिततेशी संबंधित व्यवस्था आहे. तिची चोरी होऊनही संबंधित यंत्रणेने तातडीने दखल घेतली नाही तर भविष्यात त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. संरक्षक जाळी नेमकी कधी चोरीला गेली, कोणत्या भागातून चोरी झाली, याबाबत चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच चोरी झालेल्या ठिकाणी तातडीने नवीन संरक्षक जाळी बसवून महामार्गावरील सुरक्षा व्यवस्था पूर्ववत करावी, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने केली आहे.

या प्रकरणी प्रशासनाने पंधरा दिवसांच्या आत ठोस कारवाई करावी, अन्यथा रिपब्लिकन सेनेच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. प्रसंगी रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा समन्वयक विजयदादा साळवे यांच्यासह वशिस्ट लांडगे, अंजेराम घनघाव, वैजनाथ गडशिंग, विशाल ससाने, गंगाधर सोनपसारे, धम्मा गावडे, आशोक जाधव आदी कार्यकर्ते उपस्थित होते. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी माजलगाव, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक तसेच माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे यांना देण्यात आल्या असून आता प्रशासन या तक्रारीची दखल घेऊन महामार्गावरील अतिक्रमणे, सुरक्षाव्यवस्था आणि खराब रस्त्यामुळे अपघाताचा वाढता धोका याबाबत कोणती पावले उचलते, याकडे पात्रुडसह तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. नागरिकांच्या जीविताची सुरक्षा हीच खरी प्राथमिकता असल्याने, एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने महामार्गावरील धोकादायक अतिक्रमणांवर हातोडा चालवावा, व माजलगाव तेलगाव रस्त्याची दुरवस्था तात्काळ मिटवावी अशी अपेक्षा सय्यद अन्वर यांनी व्यक्त केली आहे.

# मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशनच्या विस्ताराला गती

## काझी मुहीबुर रहेमान यांची तालुकाध्यक्षपदी नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशनच्या बीड तालुका अध्यक्षपदी काझी मुहीबुर रहेमान (आमेर) यांची नियुक्ती करण्यात आली. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अरफात खान यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे संस्थापक सचिव सय्यद सलमान, कोषाध्यक्ष वाजेद मोमिन, राज्य प्रवक्ते मुशीर भाई ईनामदार आणि युवक शहराध्यक्ष शेख सफ़वान उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत नवनियुक्त तालुकाध्यक्षांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



यावेळी मुज्तबा खान सर यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असलेल्या सामाजिक व जनहिताच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. समाजातील गरजू नागरिकांच्या प्रश्नांसाठी फाउंडेशन सातत्याने काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. सय्यद अशफाक (मुन्ना भाई) यांनी सामाजिक प्रश्नांवर संघटितपणे काम करण्याची गरज व्यक्त केली. बीड तालुक्यात फाउंडेशनचे कार्य अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. अमर सर यांनी काझी मुहीबुर रहेमान (आमेर) यांचे अभिनंदन करून त्यांना नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या. तर एहतेशाम भाई यांनी फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक करत आगामी काळात कार्य अधिक व्यापक होण्याची अपेक्षा व्यक्त केली. खदिरूज्जमा खान यांनी नवनियुक्त तालुकाध्यक्षांचे अभिनंदन करत बीड तालुक्यातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले. फाउंडेशनचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

नवनियुक्त तालुका अध्यक्ष काझी मुहीबुर रहेमान (आमेर) यांनी फाउंडेशनने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत सामाजिक व जनहिताच्या कार्याला प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी शेख अयास, आखेब राज, अलीम मोमिन, हुझेफ भाई, अयाज खान, अबरार खान, यांच्यासह मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# धारुर येथील नुरबाग सर्व्हे नं. ६२२ प्रकरणी शासनाची फसवणूक

## कथित बोगस अकृषी प्रमाणपत्र प्रकरण विभागीय आयुक्तांच्या दारी

## असद कुरेशी आणि सहकाऱ्यांचे १३ ऑगस्टपासून आमरण उपोषण सुरू

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर येथील सर्व्हे नं. ६२२ मधील 'नुरबाग' प्रकरणातील कथित बोगस अकृषी प्रमाणपत्र व त्याआधारे सन २०२४ मध्ये करण्यात आलेल्या खरेदीखताच्या प्रकरणी कारवाईच्या मागणीसाठी असद कुरेशी व इतर यांनी आज, दि.१३ ऑगस्ट २०२६ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. अर्जदाराच्या तक्रारीनुसार, दस्त क्र. १०९४/२०२४, दि.१८ जुलै २०२४ बाबत चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या व्यवहारात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गटाचे) बीड जिल्हा उपाध्यक्ष महादेव शिवाजी शिनगारे यांचे नाव अर्जदाराने तक्रारीत नमूद केले आहे. तसेच खरेदीखत देणारे व घेणारे संबंधित व्यक्तींची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. अर्जदाराने तक्रारीत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. तक्रारीनुसार, सुधीर प्रेमनाथ कोमटवार यांचे दि.६ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले होते. त्यांच्या हयातीत त्यांनी कोणतेही अकृषी प्रमाणपत्र घेतलेले नसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यांच्या निधनानंतर संबंधित मिळकतीबाबत वारसाहक्काने फेरफार क्र. १२८८२, दि.१७ एप्रिल २०२३ रोजी मंजूर करण्यात आला असून, या वारसांमध्ये कृष्णा पि. सुधीर कोमटवार यांचेही नाव असल्याचे अर्जदाराने नमूद केले आहे.



अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, संबंधित ७/१२ उताऱ्यावर कृष्णा पि. सुधीर कोमटवार यांचे नाव त्या कालावधीत नसताना दि. १३ ऑगस्ट २०२१ रोजी अकृषी प्रमाणपत्र काढण्यात आले असल्याने त्या प्रमाणपत्राच्या वैधतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होते, असा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रमाणपत्राची मूळ संचिका, त्यासाठी सादर करण्यात आलेली कागदपत्रे आणि संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी, बीड यांच्या दि.४ फेब्रुवारी २०२५ व दि. २१ एप्रिल २०२५ रोजीच्या पत्रांनंतरही अपेक्षित कारवाई झालेली नसल्याचा आरोप अर्जदाराने केला आहे. त्यामुळे या प्रकरणात राजकीय दबाव अथवा प्रशासकीय दुर्लक्षामुळे कारवाई होत नसल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

राजकीय दबाव असो किंवा प्रशासकीय दुर्लक्ष, नुरबाग प्रकरणातील सत्य बाहेर आलेच पाहिजे. कथित बोगस अकृषी प्रमाणपत्राची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका असद कुरेशी यांनी घेतली आहे. मागण्यांवर ठोस कारवाई होईपर्यंत विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू ठेवण्याचा इशारा असद कुरेशी यांनी दिला असून, या प्रकरणाकडे प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे धारूरसह जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

पान १ वरून...

### प्रसूतीदरम्यानच्या कथित हलगर्जीपणाप्रकरणी दोषींवर

यांनी म्हटले. गेल्या महिन्यात शेख मुस्कान यांच्या प्रसूतीदरम्यान मृत्यूचे प्रकरण समोर आले होते. त्यानंतर संध्या गायकवाड यांच्या प्रकरणानेही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे केवळ चौकशी समिती स्थापन करून विषय प्रलंबित न ठेवता चौकशीचा अहवाल सार्वजनिक करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली.

**यापूर्वीच्या घटनांचीही चौकशी करा**

बीड जिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल महिलांच्या मृत्यूच्या यापूर्वीच्या घटनांचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. छाया पांचाळ व मुस्कान शेख यांच्या मृत्यूच्या घटनांनंतर नातेवाईक व सामाजिक संघटनांकडून कारवाईची मागणी करण्यात आली होती. मात्र, चौकशीच्या नावाखाली विलंब होत असल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला.

**जिल्हा शल्यचिकित्सकांच्या निलंबनाची मागणी**

वारंवार कथित हलगर्जीपणाच्या घटना समोर येत असल्याने संबंधित प्रकरणांची स्वतंत्र चौकशी पूर्ण होईपर्यंत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके यांना निलंबित करावे, अशी मागणी पालकमंत्री सुनेत्रा पवार तसेच आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले. यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), सादेक सय्यद ( शहराध्यक्ष आम आदमी पार्टी बीड), बाळासाहेब मोरे पाटील (शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष), किश्किंधा पांचाळ (जिल्हाध्यक्ष विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज बीड), सुनिता पांचाळ, रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक बीड), ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे, लेक लाडकी अभियानचे बाजीराव ढाकणे, हनुमान घोडके, प्रा.आबासाहेब जाधव, भीमराव कुटे, शंकर घाडगे, सरफराज खान रामचंद्र धुमाळ, विश्वास भोरे आदी सहभागी झाले.

### बीडमध्ये २६ ऑगस्टला शमा-ए-रिसालतचा

एस.पी. ऑफिस) मार्गे जुलूस पुन्हा दर्गाह हजरत शहंशाहा वली (रह.) येथे पोहोचणार आहे. जुलूसानंतर बाद नमाज-ए-असर मस्जिद गरीब नवाज घत्रक्ष येथे फातेहा व तब्बारुक वाटप करण्यात येणार आहे. तसेच हजरत मोहम्मद मुस्तफा (स.) यांच्या मू-ए-मुबारक (दाढीचे केस) यांचे दर्शन (जियारत) घेण्याचीही भाविकांना संधी उपलब्ध होणार आहे.

या पवित्र व धार्मिक सोहळ्यात सर्व बिरादराने-मिल्लत बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जुलूसात सहभागी व्हावे, तसेच कार्यक्रम शांतता, शिस्त व बंधुभावाच्या वातावरणात पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन के.जी.एन. ग्रुप सीरत कमिटी, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### शाळांमधील व्हिडिओ-फोटो बंदीविरोधात

देण्यात आल्या आहेत. हा आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांच्या बैठकीतील सूचनेनुसार देण्यात आल्याचे पत्रात नमूद आहे.

**'कॅमेरा बंदी म्हणजे वास्तव लपविण्याचा प्रयत्न'**

शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि भयमुक्त शिक्षण मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. मात्र शाळांमधील पिण्याच्या पाण्याची समस्या, नादुरुस्त स्वच्छतागृहे, जीर्ण इमारती आणि इतर मूलभूत सुविधांची स्थिती समोर येऊ नये म्हणून हा आदेश काढण्यात आला आहे, असा आरोप डॉ. ढवळे यांनी केला.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता कॅमेऱ्यामुळे घसरत नसून प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे घसरत आहे. त्यामुळे माध्यमे, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांना शाळांमधील वस्तुस्थिती पाहण्यापासून रोखण्याऐवजी प्रशासनाने मूलभूत सुविधा आणि शैक्षणिक गुणवत्तेकडे लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

आदेश रद्द होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा

आज दि.२४ सोमवार रोजी लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत फोटो व व्हिडिओ काढून या आदेशाचा सविनय कायदेभंग केला आहे. हा लढा शांततापूर्ण व अहिंसक मार्गाने सुरू असून आदेश रद्द होईपर्यंत लोकशाही मार्गाने आंदोलन सुरूच ठेवण्यात येईल, असा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला.

अभिजित दिपके यांच्या 'स्कुल ठीक करो' अभियानाला पाठिंबा ; दिपके वरील शाळा तपासणी दरम्यान दाखल गुन्हा मागे घ्या : डॉ.गणेश ढवळे

सीजेपीचे संस्थापक अध्यक्ष अभिजित दिपके यांच्या सरकारी शाळांचे वास्तव दाखवत शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देऊन शैक्षणिक सुधारणा कराव्यात या प्रमुख मागणीसाठी देशभरात सुरू केलेल्या स्कुल ठीक करो अभियानाला पाठींबा असुन त्यांच्यावरील लातुर जिल्ह्यातील औसा येथील शाळा तपासणी केल्यामुळे दाखल करण्यात आलेला गुन्हे रद्द करण्यात यावेत अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

### जिल्हाधिकारी साहेब, आपण कलावंतांवर

रुपये अध्यक्ष असलेल्या जिल्हाधिकारी यांच्या निष्काळजीपणामुळे कलावंतांना मिळू शकलेले नाही.

शासन निर्णयानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी समितीची बैठक दरवर्षी घेऊन कलावंतांची निवड केली असती तर गेल्या तीन वर्षापासून शेकडो कलावंत मानधनापासून वंचित राहिले नसते. मानधनाविना तीन वर्ष संपत आले तरीही समितीची ना बैठक घेण्यात येते, ना ज्येष्ठ कलावंतांना या योजनेतून लाभ मिळतोय. यामुळे सर्व ज्येष्ठ कलावंतांनी वैतागून सामूहिक आत्मदहन करण्याचा निर्णय घेतला असून येत्या आठ ते दहा दिवसात जिल्हाधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या योजनेचा व कलावंतांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून समितीची बैठक बोलावून कलाकारांची निवड करावी आणि शासनाकडून देण्यात येणाऱ्या मानधनाचा लाभ मिळवून द्यावा. अन्यथा येत्या सप्टेंबर (२०२६) महिन्यात सर्व कलावंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला असून आता कलावंतांच्या या समितीचे अध्यक्ष असलेले जिल्हाधिकारी काय पाऊल उचलतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवेदनावर चंद्रकांत लिंबाजी भालेराव, मोहन रुद्रा दराडे, लक्ष्मण नामदेव खेडकर, अशोक तुकाराम बुरंगे, छाया कोकाटे, महादेव कारभारी खेडकर, यांच्यासह इतरांची नावे व सह्या आहेत.

# शाळेच्या कारभाराचे फोटो काढायलाही परवानगी?

## विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कारण देत शाळांची पोलखोल थांबविण्याचा प्रयत्न; सीईओ जितीन रेहमान यांच्या आदेशावर डॉ. गणेश ढवळेंचा संतप्त सवाल

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पिण्याच्या पाण्याची समस्या, अस्वच्छ शौचालये, तुटलेल्या खिडक्या, मूलभूत सुविधांचा अभाव तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांच्या अडचणी समोर आणण्यासाठी सुरू असलेल्या 'स्कूल ठीक करो' अभियानाला प्रशासनाने आळा घालण्याचा प्रयत्न सुरू केला आहे का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी १५ ऑगस्टपासून सुरू केलेल्या 'स्कूल ठीक करो' अभियानामुळे ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील वास्तव समोर येत आहे. शाळांना भेटी देऊन तेथील मूलभूत सुविधा, विद्यार्थ्यांच्या अडचणी आणि शिक्षकांशी संवाद साधून त्याचे व्हिडिओ व फोटो सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रसिद्ध केले जात असल्याने प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाल्याचा आरोप डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे.

दरम्यान, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान यांनी २० ऑगस्ट रोजी तातडीची बैठक घेऊन गटशिक्षणाधिकाऱ्यांमार्फत केंद्रप्रमुखांना सूचना दिल्याचे समोर आले आहे. त्यानुसार बीड पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी प्रणिता गंगाखेडकर यांनी केंद्रप्रमुखांना लेखी सूचना देऊन त्यांच्या अधिनस्त सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांच्या मुख्याध्यापकांना कळविण्यास सांगितले



आहे की, शाळेच्या वेळेत शाळाबाह्य व्यक्तींनी विविध विषयांबाबत व्हिडिओ अथवा फोटो काढण्यापूर्वी मुख्याधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे, शाळेच्या वेळेत मुख्याध्यापकांनी अशा प्रकारची परवानगी देऊ नये, संबंधित व्यक्तींशी सौम्य व विनम्र शब्दांत चर्चा करून त्यांना शाळेच्या वेळेव्यतिरिक्त उपस्थित राहण्यास सांगावे, अशीही सूचना करण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होणार नाही, असे कारण देण्यात आले आहे.

शाळांची पोलखोल थांबवण्यासाठी प्रशासनाचा नवा फतवा?'

एरवी ग्रामीण भागातील सरकारी शाळांमध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, इमारती, वर्गखोल्या, खिडक्या आदी मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र या समस्यांचे वास्तव समाजासमोर आणण्यासाठी कोणी शाळेत जाऊन पाहणी केली आणि फोटो-व्हिडिओ काढले की अचानक विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची चिंता प्रशासनाला कशी काय वाटू लागली? असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी केला. शाळेतील गैरसोयींचे फोटो काढण्यापूर्वी परवानगी आणि शाळेच्या वेळेत परवानगीच देऊ नका, हा आदेश नेमका कोणाला वाचवण्यासाठी आहे? विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. शाळांची अवस्था दाखविणाऱ्यांना रोखण्याऐवजी प्रशासनाने शाळांची अवस्था सुधारावी, अशी टीका डॉ. गणेश ढवळे यांनी केली.

'डोके ठिकाणावर आहे का?' : डॉ. गणेश ढवळे

शाळांमध्ये पारदर्शकता राहण्यासाठी पालक, शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच, शिक्षणप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग आवश्यक आहे. शाळेतील समस्या समोर आणणाऱ्या व्यक्तींना रोखण्यापेक्षा त्यांच्या तक्रारींची दखल घेऊन त्या सोडविणे गरजेचे आहे. त्यामुळे सीईओ जितीन रेहमान यांनी काढलेल्या या सूचनेमागील नेमका उद्देश काय, असा सवाल उपस्थित करत जिल्हा प्रशासनाचे डोके ठिकाणावर आहे का? असा संतप्त सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी केला.

## आंध्र प्रदेशातील कुप्पमच्या प्रशिक्षणातून बीडच्या शिक्षकांची ज्ञानयात्रा, शैक्षणिक गुणवत्तेला नवी दिशा!

**माजलगाव । शेख अखिल**

आंध्रप्रदेशातील कुप्पम येथे आयोजित विशेष गणित व विज्ञान शिक्षक प्रशिक्षणात बीड जिल्ह्यातील निवडक शिक्षकांनी सहभागी होत आपल्या जिल्ह्याचे गौरवपूर्ण प्रतिनिधित्व केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी - केंद्रित शिक्षण मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे प्रशिक्षण शिक्षकांसाठी ज्ञान, अनुभव आणि नव्या शैक्षणिक दृष्टिकोनाची समृद्ध पर्वणी ठरले.



या प्रशिक्षणात बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत हम्पे मॅडम (जि.प. माध्यमिक शाळा चौसाळा मुख्याध्यापिका) दिपक मोरे सर (दौला वडगाव-केंद्रप्रमुख), प्रकाश गोरे सर (उपळी हायस्कूल, उपळी), विनायक सरवदे (माध्यमिक विद्यालय पिंपरखेड), जाधव सर (जि.प. माध्यमिक शाळा, धोंडराई), मगरे मॅडम (जि.प. माध्यमिक शाळा, माजलगाव) आणि तवले सर (जि.प. माध्यमिक शाळा, टाकळशिंग), श्रुती लहाने मॅडम (साने गुरुजी निवासी विद्यालय केज) सूर्यवंशी, शिंदे सर (योगेश्वरी विद्यालय अंबाजोगाई) यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. या प्रशिक्षणादरम्यान नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञान, कृती आधारित शिक्षण, विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग आणि विविध शैक्षणिक उपक्रम यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी शिक्षकांना मिळाली. विविध भागांतून आलेल्या शिक्षकांसोबत विचारांची व अनुभवांची देवाणघेवाण झाल्यामुळे अध्यापनाकडे पाहण्याचा नवा आणि व्यापक दृष्टिकोन विकसित झाला.

विशेष म्हणजे, बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यासह विविध तालुक्यांतील शिक्षकांनी राष्ट्रीय स्तरावरील या शैक्षणिक उपक्रमात सहभागी होत आपल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण केली आहे. हा सहभाग केवळ प्रशिक्षणापुरता मर्यादित न राहता, कुप्पममध्ये मिळालेले ज्ञान, अनुभव आणि नव्या अध्यापन पद्धती आपल्या शाळांपर्यंत पोहोचवून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणे, हीच या प्रशिक्षणाची खरी फलश्रुती ठरणार आहे. ही अमूल्य संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान, शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, प्रिया राणी पाटील तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई यांचे या सहभागी शिक्षकांतर्फे मनःपूर्वक आभार मानले जात आहेत.

या ज्ञानयात्रेत सहभागी झालेल्या बीड जिल्ह्यातील सर्व शिक्षकांचे शिक्षण क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. आपली शिकण्याची जिद्द, प्रयोगशील वृत्ती, नेतृत्वगुण आणि शिक्षणाप्रती असलेली निष्ठा निश्चितच इतर शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. कुप्पममध्ये मिळालेले ज्ञान आता बीड जिल्ह्यातील प्रत्येक शाळेपर्यंत पोहोचावे आणि त्या ज्ञानातून हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याला नवी दिशा मिळावी हीच सदिच्छा.


## माजलगाव शहरात प्रथमच वन डे लुक अँड लर्न सेमिनारचे आयोजन

### मराठी चित्रपट प्रसिद्ध सिनेतारिका किशोरी शहाणे यांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्राचे वितरण

**माजलगाव । शेख अखिल**

माजलगाव शहरांमध्ये प्रथमच वन डे लुक अँड लर्न सेमिनारचे आयोजन प्रिया ब्युटी पार्लर अँड मेकअप स्टुडिओ केसापुरी कॅम्प यांच्यावतीने सौभाग्य मंगल कार्यालय केसापुरी कॅम्प या ठिकाणी भव्य दिव्य असे आयोजन करण्यात आले होते. सौंदर्य, फॅशन व मेकअप क्षेत्रात नवीन संधी आणि बदलत्या ट्रेंड विषयी मार्गदर्शन या सेमिनारच्या माध्यमातून करण्यात आले. या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील व तालुक्यातील सौंदर्य, फॅशन व मेकअप क्षेत्रातील विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षक महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला होता.

या कार्यक्रमास मराठी चित्रपट प्रसिद्ध सिनेतारिका किशोरी शहाणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली असल्याने त्यांच्या या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या किशोरी शहाणे यांनी या



कार्यक्रमास उपस्थित असलेल्या व सहभागी झालेल्या विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षक यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, क्षेत्र कुठलेही असो जिद्द, चिकाटी, मेहनत, कौशल्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर माणसाला उत्तम करिअर करता येते. या आयोजित सेमिनार मध्ये विविध उपक्रम व प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून लाभलेल्या मराठी चित्रपट सिनेतारिका किशोरी शहाणे व आयोजक प्रिया डोंगरे मॅडम यांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

माजलगाव शहरांमध्ये प्रथमच आशा प्रकारच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आल्याने फॅशन, सौंदर्य, व मेकअप क्षेत्रातील विद्यार्थी प्रशिक्षणार्थी व महिला मध्ये उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळाले. आयोजकाच्या या उपक्रमांचे उपस्थितांकडुन भरभरून कौतुक करण्यात आले. हा कार्यक्रम सुरळीत पार पाडण्याकरिता प्रिया ब्युटी पार्लर अँड मेकअप स्टुडिओ केसापुरी कॅम्प च्या प्रिया डोंगरे (मॅडम) तसेच त्यांच्या सहकारी महिला टीमने अथक परिश्रम घेत हा कार्यक्रम सुरळीत पार पाडला.

## खासबाग मैदानाला 'शहीद-ए-वतन टीपू सुलतान मैदान' नाव देण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**



शहरातील प्रभाग क्रमांक १८ मधील खासबाग मैदानास 'शहीद-ए-वतन टीपू सुलतान मैदान' असे नामकरण करण्यात यावे, अशी मागणी शेख सलमान शाहरुख खान यांनी केली आहे. खासबाग मैदान हे परिसरातील नागरिक, युवक तसेच खेळाडूंसाठी महत्त्वाचे सार्वजनिक मैदान आहे. भारताच्या इतिहासातील शौर्य, पराक्रम आणि स्वाभिमानाचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे टीपू सुलतान यांच्या स्मरणार्थ या मैदानाला त्यांचे नाव देण्यात यावे, अशी भावना शेख सलमान शाहरुख खान यांनी व्यक्त केली.

याबाबत नगर परिषद, बीडच्या नगराध्यक्षांकडे निवेदन सादर करण्यात आले असून, सदर विषय आगामी सर्वसाधारण सभेच्या अजेंड्यावर घेऊन 'शहीद-ए-वतन टीपू सुलतान मैदान' या नामकरणाचा ठराव मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. नगर परिषद प्रशासनाने नागरिकांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकरात लवकर आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा शेख सलमान शाहरुख खान यांनी व्यक्त केली आहे.

## डॉ. नरेंद्र दाभोलकर अमर रहे! महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा बीडतर्फे अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे प्रणेते आणि संघटनेचे संस्थापक कर्ते सामाजिक कार्यकर्ते डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शाखा बीडच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण करून उपस्थितांनी अभिवादन केले. 'फुले शाहू आंबेडकर, आम्ही सारे दाभोलकर', 'विवेकाचा आवाज बुलंद करू या', अशा घोषणा देत त्यांच्या विवेकवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या विचारांचे स्मरण करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. सविता शेटे, राज्य कार्यवाह, विवेकवाहिनी, प्राचार्य कॉ.डी.जी. तांदळे, जिल्हा उपाध्यक्ष आणि शेखर कुमार, 'सा.वादळ'चे संपादक यांनी डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या आठवणी जागवल्या.



कार्यक्रमास अंधश्रद्धा निर्मूलन समिती बीड शाखेचे कार्याध्यक्ष प्रा.विजय घेवारे, प्रधान सचिव ॲड. करुणा टाकसाळ, जिल्हा महिला सहभाग विभाग सह कार्यवाह शुभांगी कुलकर्णी, अनुसयाताई तांदळे, पोर्णिमा निर्मळ, शाखा कायदा व्यवस्थापन विभाग कार्यवाह ॲड अंबादास आगे, व्यसन प्रबोधन आणि संघर्ष विभागाचे कार्यवाह बाजीराव ढाकणे, ॲड. नितीन रांजवण, ॲड. बक्षूभाई सय्यद, शिवाजी नागरगोजे, प्रोफेसर विधिज्ञ पंकज तांदळे, नितीन जायभाये, प्राचार्य राजकुमार कदम, शेख मुसा, किशोर देवा कुलकर्णी तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

डॉ. दाभोलकर यांनी समाजातील अंधश्रद्धा, रूढी आणि अनिष्ट प्रथांविरोधात आयुष्यभर केलेल्या संघर्षाची आठवण यावेळी उपस्थितांना करून दिली. वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद आणि मानवतावादी विचार समाजात रुजविण्यासाठी डॉ. दाभोलकर यांचे कार्य पुढे नेण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. माणूस मारता येतो पण विचार मारता येत नाहीत, त्यामुळे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे कार्य पुढे नेण्याचा निर्धार सर्वांनी केला. डी.जी. तांदळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## डॉक्टरांच्या हलगर्जीपणाने संध्या मृत्यूच्या दारात!

### दलित पँथर आक्रमक! दोषींना वाचवले तर रस्त्यावर उतरू : धम्मानंद वाघमारे

**बीड । प्रतिनिधी**

सिझेरियन शस्त्रक्रियेदरम्यान वैद्यकीय निष्काळजीपणामुळे महिलेच्या पोटात हॅन्डग्लोज व रुमाल राहिल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, संध्या गायकवाड यांच्यावर पुण्यातील ससून रुग्णालयात दोन मोठ्या शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती आहे. सध्या त्यांची प्रकृती गंभीर असून त्या मृत्यूशी झुंज देत असल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्हा रुग्णालयात सिझेरियन झाल्यानंतर काही काळाने संध्या गायकवाड यांच्या पोटात तीव्र वेदना सुरू झाल्या. त्यानंतर त्यांना बीड शहरातील ढाकणे हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तेथे उपचारासाठी मोठी रक्कम मागितल्याचा कुटुंबीयांचा आरोप




आहे. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने कुटुंबीयांनी पुढील उपचारासाठी त्यांना पुण्यातील ससून रुग्णालयात दाखल केले. तेथे त्यांच्यावर दोन मोठ्या शस्त्रक्रिया झाल्याचे सांगण्यात येते. या प्रकरणात बीड जिल्हा रुग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुशीलकुमार सोळंके, डॉ. पूनम लोध आणि संबंधित ऑपरेशन थिएटरमधील कर्मचारी यांच्यावर गंभीर निष्काळजीपणाचे आरोप करण्यात आले आहेत. या आरोपांची तातडीने निष्पक्ष वैद्यकीय चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

गरीब कुटुंबातील एका मुलीच्या जीवाशी खेळण्याचा अधिकार कोणत्याही डॉक्टरला नाही. संध्या गायकवाड यांच्या अवस्थेला जबाबदार असणाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. कारवाई झाली नाही तर दलित पँथर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशारा दलित पँथर बीड जिल्हाध्यक्ष धम्मानंद वाघमारे यांनी माध्यमांशी बोलताना दिला. या प्रकरणाची शासनाने तातडीने दखल घेऊन स्वतंत्र वैद्यकीय चौकशी, दोषींवर कायदेशीर कारवाई आणि संध्या गायकवाड यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च शासनाने उचलावा, अशी मागणी करण्यात येत आहे. संध्याला न्याय मिळालाच पाहिजे; हलगर्जीपणा करणाऱ्यांना संरक्षण नको!

## १२ रबीउल अव्वलनिमित्त २६ ऑगस्टला भव्य रक्तदान शिबिर : शेख फारुख

**बीड । प्रतिनिधी**

इस्लामी दिनदर्शिकेतील पवित्र १२ रबीउल अव्वल या मुबारक पर्वाचे औचित्य साधत मानवता, बंधुभाव आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यासाठी २६ ऑगस्ट रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत बशीरगंज येथील अथर बाबर शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं.१८ येथे हे रक्तदान शिबिर पार पडणार आहे. रक्ताची गरज ही कोणत्याही धर्म, जात किंवा समाजापुरती मर्यादित नसते. अपघातग्रस्त, गंभीर आजाराने उपचार घेत असलेले रुग्ण, शस्त्रक्रियेसाठी दाखल झालेले रुग्ण तसेच प्रसंगी रक्ताची तातडीने आवश्यकता असलेल्या अनेक रुग्णांसाठी रक्तदान हे जीवनदायी ठरते. त्यामुळे समाजातील निरोगी



नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करून मानवसेवेच्या या कार्यात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

१२ रबीउल अव्वल हा पवित्र दिवस प्रेम, करुणा, मानवता, बंधुभाव आणि समाजसेवेची प्रेरणा देणारा आहे. याच विचारांना कृतीची जोड देत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे शेख फारुख यांनी सांगितले. मानवसेवेपेक्षा मोठी सेवा नाही. एखाद्या गरजू रुग्णाला आपल्या रक्ताचा एक थेंबही नवजीवन देऊ शकतो. १२ रबीउल अव्वलच्या पवित्र पर्वानिमित्त आयोजित या रक्तदान शिबिरातून मानवता आणि बंधुभावाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. बीड शहरातील युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्व समाजातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन शेख फारुख यांनी केले.

या शिबिरात युवकांचा सहभाग वाढावा तसेच नागरिकांमध्ये रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण व्हावी, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. रक्तदान हे केवळ सामाजिक कर्तव्य नसून एखाद्याचे प्राण वाचविण्याची अमूल्य संधी आहे. त्यामुळे बीड शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करा, जीवन वाचवा या मानवतावादी संदेशाला बळ द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मराठा समाजाच्या माता-भगिनींबाबत कथित आक्षेपार्ह वक्तव्य; नवनाथ वाघमारे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**पाटोदा । फयाज सय्यद**

मराठा समाजाच्या माता-भगिनींबाबत कथितरीत्या आक्षेपार्ह व अवमानकारक वक्तव्य केल्याचा आरोप असलेल्या नवनाथ वाघमारे यांच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पाटोदा शहरातील सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

याप्रकरणी सकल मराठा समाजाच्या प्रतिनिधींनी पाटोदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. प्रसारमाध्यमांमध्ये नवनाथ वाघमारे यांनी मराठा समाजातील माता-भगिनींबाबत कथितरीत्या केलेल्या वक्तव्यामुळे समाजाच्या



भावना दुखावल्या असून, प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. सदर वक्तव्याची निष्पक्ष चौकशी करून, कायद्याचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित कायदेशीर कलमांनुसार गुन्हा दाखल करावा, तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी समाजाच्या प्रतिनिधींनी केली.

दरम्यान, समाजातील शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक सलोखा अबाधित राहण्यासाठी प्रशासनाने प्रकरणाची तातडीने चौकशी करून योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला.

**– सकल मराठा समाज, पाटोदा शहर**

## नागपंचमीच्या निमित्ताने राजीव गांधी प्राणीसंग्रहालयाला अत्याधुनिक सर्प रेस्क्यू उपकरणांची भेट

**पुणे । प्रतिनिधी**

नागपंचमीच्या पावन पर्वानिमित्त सर्वात्मक महारुद्र परिवार ट्रस्टच्या वतीने गुरुवर्य प्रकाशभाऊ शिंदे यांनी राजीव गांधी प्राणीसंग्रहालयास सापांच्या सुरक्षित रेस्क्यूसाठी आवश्यक असलेली अत्याधुनिक व परदेशातून आयात केलेली उपकरणे आज सप्रेम भेट देण्यात आली. सापांचे सुरक्षित रेस्क्यू, त्यांचे संरक्षण तसेच मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने ही उपकरणे अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. सर्पमित्र व प्राणीसंग्रहालयातील कर्मचाऱ्यांना साप हाताळताना अधिक सुरक्षितता मिळावी आणि सापांना कोणतीही इजा न होता त्यांचे सुरक्षित स्थलांतर करता यावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



या प्रसंगी उपअधीक्षक सरडे मॅडम, संचालक राजकुमार जाधव साहेब तसेच हेड निमल किपर कौशिक काशीकर, प्राणीमित्र बाळासाहेब ढमाले, डॉ प्रवीण बढे, अथर्व भोसले, तेजस कराड, अथर्व बाणखेले, अजित कासकर यांची प्रमुख उपस्थिती होती. नागपंचमीच्या निमित्ताने केवळ धार्मिक परंपरा न पाळता सर्पसंवर्धन, वन्यजीव संरक्षण आणि जनजागृतीला चालना देणारा हा उपक्रम सर्वात्मक महारुद्र परिवार ट्रस्टच्या सामाजिक व पर्यावरणपूरक कार्याची दिशा अधोरेखित करणारा ठरला.

नागपंचमीच्या निमित्ताने केवळ पारंपरिक पूजनापुरते मर्यादित न राहता सर्पसंवर्धन, वन्यजीव संरक्षण आणि जनजागृतीला प्रत्यक्ष चालना देणारा हा उपक्रम सर्वात्मक महारुद्र परिवार ट्रस्टच्या सामाजिक व पर्यावरणपूरक कार्याची ठळक ओळख अधोरेखित करणारा ठरला.

**– गुरुवर्य श्री प्रकाशभाऊ शिंदे, (मठाधिपती)**
**सर्वात्मक महारुद्र परिवार ट्रस्ट**

## अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील आग दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करा : नितीन सोनवणे

**अमरावती । प्रतिनिधी**



अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात लागलेल्या भीषण आगीत तीन बालकांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुःखद व हृदयद्रावक आहे. या घटनेची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी केली आहे.

या दुर्घटनेबाबत बोलताना सोनवणे म्हणाले की, रुग्णालयांसारख्या संवेदनशील ठिकाणी अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन व्यवस्थेत कोणतीही त्रुटी राहणे गंभीर बाब आहे. आगीत तीन निष्पाप बालकांचा मृत्यू झाला असून, या घटनेमागे निष्काळजीपणा किंवा सुरक्षाविषयक त्रुटी आढळल्यास संबंधित अधिकारी व दोषींवर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. आरोग्यमंत्री आणि आरोग्य विभागाच्या सचिवांनी तातडीने अमरावती येथे भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा, तसेच संपूर्ण घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली. मृत बालकांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारने प्रत्येकी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी. तसेच जखमी बालकांवर आवश्यक ते सर्व उपचार शासकीय खर्चाने करण्यात यावेत आणि याबाबत अमरावती जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ निर्देश देण्यात यावेत, अशी मागणी सोनवणे यांनी केली. दरम्यान, या दुर्घटनेत ३६ बालकांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आल्याची बाब दिलासादायक आहे. मात्र, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमधील अग्निसुरक्षा यंत्रणा, आपत्कालीन मार्ग आणि सुरक्षा उपाययोजनांचे तातडीने ऑडिट करण्यात यावे, अशी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने मागणीही त्यांनी केली. तीन निष्पाप बालकांचा मृत्यू केवळ दुःख व्यक्त करून विसरला जाऊ नये. घटनेची वस्तुनिष्ठ चौकशी करून दोष निश्चित करणे आणि जबाबदारी ठरवणे आवश्यक आहे, असे नितीन सोनवणे यांनी स्पष्ट केले.

## उपसरपंच संतोष तेलप व पाच गावच्या उपोषणाला तब्बल ६ दिवसानंतर मोठे यश

### बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे ग्रामस्थांनी मानले आभार

**बीड । प्रतिनिधी**

पिंपळगाव घाट ता.जि.बीड ते पांढरेवाडी (ईट) ता.भुम जि.धाराशिव जिल्ह्याच्या सरहद्दीवरील जोड रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी व तो रस्ता खुला करून देण्यासाठी पिंपळगाव घाट चे उपसरपंच संतोष महादेव तेलप हे दि.१५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वा. बेमुदत उपोषणाला बसले होते ६ दिवसानंतर दि.२० ऑगस्ट रोजी त्या उपोषणाला खूप मोठे यश आले असून तो रस्ता बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी जलसंपदा विभाग, भूमी अभिलेख विभाग व पोलीस प्रशासनाच्या मदतीने खुला करून दिला असून त्या रस्त्याच्या कामाला स्थानिक आजी माजी लोकप्रतिनिधींना व ग्रामस्थांना, शेतकऱ्यांना सोबत घेहुन सुरुवात केली आहे.



बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना राष्ट्रवादीकाँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे युवा नेते पांडुरंग आवारे-पाटील यांनी विडिओ कॉल वरून संतोष महादेव तेलप यांच्या आई व डेपोटी इंजिनअर देशमुख रोकडा आई देवस्थानचे नरेश महाराज यांच्या हस्ते उपोषण सोडवण्यात आले. यावेळेस जलसंपदा खात्याचे डेपोटी इंजिनअर माणिकराव देशमुख साहेब, नेकनुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मंगेशजी साळवे, अभियंता कोकाटे, महसूल अधिकारी कदम, इंजिनअर ऐश्वर्या व सर्व सहकार्य करणार्या प्रशासनाचे पञकार बांधवाचे बीड आणि धाराशिव जिल्ह्याला सरहद्दीवरील जोडणारा रस्ता खुला करून दिल्या बद्दल पिंपळगाव घाट, मानेवाडी, वाढवणा, रूईगव्हान-माळेवाडी ग्रामस्थांनी आभार मानले व उपोषणाची सांगता राष्ट्रगीत करून करण्यात आली.

## साखरेच्या दरवाढीतुन गतवर्षीच्या ऊसाला प्रति टन १५०० रुपये प्रमाणे अंतिम बिल द्या : नारायण गोले पाटील

**माजलगाव । शेख अखिल**

गतवर्षीच्या ऊस गाळप हंगामात साखरेचा दर कमी असल्याचे कारण सांगून शेतकऱ्यांना कमी दर देण्यात आला. मात्र, सध्या साखरेच्या दरात मोठी वाढ झाली असून या वाढीचा लाभ गतवर्षी ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे गतवर्षीच्या ऊसाला प्रतिटन १,५०० रुपये प्रमाणे अंतिम बिल तात्काळ अदा करावे, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई ड. नारायण गोले पाटील यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी माजलगावचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन माजलगाव मतदारसंघासह जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी गतवर्षीच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अंतिम बिलापोटी प्रतिटन १,५०० रुपये तातडीने अदा करण्याची मागणी केली आहे. गतवर्षी साखरेचा दर सुमारे ४० रुपये किलो म्हणजे ४ हजार रुपये क्विंटल असल्याचे कारण देत



शेतकऱ्यांना केवळ २,७७५ रुपये प्रतिटन दर देण्यात आला. त्यावेळी साखरेच्या दराचा आधार घेऊन उसाचा भाव ठरविण्यात आला असेल, तर आता साखरेच्या दरात झालेल्या वाढीचा लाभही शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे, अशी भूमिका भाई ड. गोले पाटील यांनी मांडली.

सध्या साखरेच्या दरात मोठी वाढ झाल्याने कारखानदारांना त्याचा आर्थिक फायदा होत आहे. मात्र, गतवर्षी ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा अंतिम मोबदला मिळालेला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे कारखानदारांनी शेतकऱ्यांच्या उसाच्या अंतिम दराचा फेरविचार करून प्रति टन १,५०० रुपये अंतिम बिलाच्या स्वरूपात तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशावर कारखानदारांनी मलिदा लाटू नये, तर शेतकऱ्यांच्या उसाला अंतिम बिल प्रतिटन १५०० रु.द्यावे अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने कारखानदारांच्या विरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही भाई ड. नारायण गोले पाटील यांनी दिला आहे. या निवेदनावर भाई सलीम खान पठाण, श्रीराम शेवाळे, भागवतराव कोळसे, बालासाहेब जाधव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# श्रीक्षेत्र नारायणगडच्या प्रमुख रस्त्याची चाळण; भाविकांची कसरत, लोकप्रतिनिधी-प्रशासनाचे दुर्लक्ष

## ‘धाकटी पंढरी’कडे जाणाऱ्या नवगण राजुरी–नारायणगड रस्त्याची तातडीने दुरुस्ती करा : डॉ. गणेश ढवळे

**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान आणि ‘धाकटी पंढरी’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायणगड देवस्थानाकडे जाणाऱ्या नवगण राजुरी ते नारायणगड प्रमुख रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने भाविक, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. धार्मिक कार्यक्रमांच्या निमित्ताने याच ठिकाणी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची मोठी उपस्थिती असते; मात्र देवस्थानाकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्याच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, लिंबागणेशकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

श्रीक्षेत्र नारायणगड हे बीड जिल्ह्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक असून वर्षभर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांना जिल्हाभरातून मोठ्या संख्येने भाविक येतात. त्यामुळे नवगण राजुरी ते नारायणगड हा प्रमुख रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र रस्त्याची दुरवस्था झाल्याने भाविकांना त्रास सहन करावा लागत असून अपघाताचा धोका देखील निर्माण झाला आहे.

**पर्यावरण संवर्धनाचा संदेश देताना रस्त्याच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष का?**

दि.६ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत ‘झाडे लावा, झाडे जगवा’ आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याचे आवाहन करण्यात आले. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असा प्रेरणादायी संदेशही देण्यात आला. मात्र त्याच जिल्ह्यातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्राकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्याची झालेली दुरवस्था प्रशासनाच्या निदर्शनास का येत नाही, असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे. नारायणगड देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्याची तातडीने पाहणी करून खड्डे बुजविण्यासह आवश्यक ती डांबरीकरणाची कामे करण्यात यावीत. भाविकांच्या सुरक्षिततेचा विचार करून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

**तीन प्रमुख मागण्या**

नवगण राजुरी–नारायणगड रस्त्याची तातडीने पाहणी करून दुरुस्ती करावी. रस्त्यावरील मोठे खड्डे तात्काळ बुजवून वाहतूक सुरळीत करावी. श्रीक्षेत्र नारायणगडच्या धार्मिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा विचार करून रस्त्याच्या कायमस्वरूपी सुधारणेसाठी निधी उपलब्ध करून द्यावा.




## नविन भटवडगाव गट न. १६० मधील मुख्य वर्दळ असणाऱ्या रस्त्याचे तीन तेरा

### भाटवडगाव ग्रामपंचायत फक्त कर वसुल करण्यात वेस्त नाहरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी एक हजार रुपये मोजावे लागतात ग्रामपंचायतची विकासाकडे भरारी

**माजलगाव | शेख अखिल**

भाटवडगाव ग्रामपंचायत माजलगाव शहराजवळ असल्यामुळे या गावाचा चांगलाच विकास होताना दिसत आहे. या ग्रामपंचायतच्या हद्दीत नविन माजलगाव शहर वसलेले आहे. तसें पाहिलेतर या भागात प्लॉट जर विकत घ्यायला गेले तर सर्व साधारण नागरिक प्लॉट खरेदीच करू शकत नाहीत. एवढ्या प्लॉटच्या किमती गगणाला भिडलेल्या आहे. तीस चाळीस लाखाला या भागामध्ये प्लॉट विकले जातात मोठमोठ्ठे बिल्डिंगचे बांधकाम या भागात झालेले आहे अणि होत आहेत यामुळे



या ग्रामपंचायतच्या महसूल मध्ये देखील चांगल्या प्रकारे भर पडलेली आहे.

माजलगाव तालुक्यातील जास्तीत जास्त शहरीकरण भटवडगाव ग्रामपंचायत च्या हद्दीत होत आहे तरी देखील या भागातला मुख्य हायवेला जोडणारा रस्ता खडेमय झालेला आहे. ना नाल्या ना रस्ता अनेक वर्षांपासून या भागात राहणारे नागरिक ग्रामपंचायतकडे या रस्त्याची आणि नाल्याची मागणी वारंवार करत असताना देखील ग्रामपंचायत याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे. अनेक वेळेस या रस्त्याची आणि नाल्याच्या बातम्या वेगवेगळ्या वृतपात्रात प्रसिद्ध होऊन देखील भाटवडगाव ग्रामपंचायत याची दखल का घेत नाही, असा प्रश्न या भागातील मतदारांनी ग्रामपंचायतकडे केला आहे.

## बीडच्या भूमापन कार्यालयाची झाडाझडती घ्या : एस.एम.युसूफ़, रमेश गंगाधरे

### उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करून तक्रार निवारण कक्ष स्थापन करा

**बीड | प्रतिनिधी**

बीडच्या भूमापन कार्यालयाची झाडाझडती घेऊन दोषी अधीक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे तसेच भूमापन कार्यालयात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तक्रार निवारण कक्ष स्थापन करून उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करावी अशा मागण्या मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केल्या आहेत.

या विषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, गेल्या काही वर्षांपासून बीडच्या भूमापन अधीक्षक कार्यालयात अनागोंदी



कारभार सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने वाढत आहेत. एकाची जमीन परस्पर दुसऱ्याच्या नावे करणे, मूळ मालकाला याचा थांगपत्ता लागू न देणे, मूळ मालकाला माहिती मिळाल्यानंतर त्याने केलेल्या तक्रारीवर कोणतीही कारवाई न करणे, अशाप्रकारे अन्यायकारक कारभार होऊ लागल्याच्या तक्रारीत सातत्याने वाढ होत आहे. यामुळे मूळ मालक आणि ट्रस्टी छळले जात आहेत. मूळ मालकांच्या जमिनींशिवाय मंदिर, मस्जिद, स्मशान, कब्रस्तान सारख्या स्थळांच्या इनामी किंवा जागिरी नसलेल्या रजिस्टर्ड जमिनी सुद्धा भूमापन कार्यालयाच्या अनागोंदी कारभारामुळे भूमाफिया आणि भूचोरांच्या नावे लावल्या जात असल्याची उदाहरणे समोर येत आहेत. मंदिर, मस्जिद, स्मशान, कब्रस्तान सारख्या ट्रस्ट च्या नावे असलेल्या मोकळ्या सहन जागा सुद्धा ट्रस्टींना कुठलीही पूर्व कल्पना किंवा सुचना न देता भूमाफिया किंवा भूचोरांच्या नावे केल्या जात असल्याच्या तक्रारीही सातत्याने वाढू लागल्या आहेत.

भूमापन अधीक्षक कार्यालयात धनीला धतुरा अन् चोरांना मलिदा मिळू लागला आहे. यामुळे मूळ मालकांना तसेच ट्रस्टींना न्याय मागण्यासाठी नाविलाजास्तव कोर्टाची पायरी चढावी लागत आहे. जिथे दिवाणी दावे वर्षानुवर्षे रखडून पडलेले आहेत. यामुळे मूळ मालकांसह ट्रस्टींना विनाकारण हाल अपेष्टा सोसून शारीरिक आणि मानसिक त्रासासह अतिरिक्त मोठा आर्थिक भार सहन करून वर्षानुवर्षे कोर्टात हेलपाटे मारावे लागत आहे. या सर्व बाबींकडे जिल्हाधिकारी यांनी विशेष लक्ष देऊन बीडच्या भूमापन अधीक्षक कार्यालयाची झाडाझडती घेऊन दोषी अधीक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. तसेच जमिनीच्या मूळ मालकांसह मंदिर, मस्जिद, स्मशान, कब्रस्तान सारख्या स्थळांच्या ट्रस्टींना त्रास होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून बीडच्या भूमापन कार्यालयात एक विशेष असे तक्रार निवारण कक्ष स्थापन करावे. तिथे उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करून संबंधितांवर भूमापन कार्यालयाकडून अन्याय होत असल्यास तिथल्या तिथे ताबडतोब न्याय मिळवून देण्यात यावा. अशी मागणी एस.एम.युसूफ़ आणि रमेशराव गंगाधरे यांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

## नवनाथ शिराळे पाटील व इतरांना उच्च न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर

**बीड | प्रतिनिधी**

सत्य परेशान हो सकता है, लेकिन पराजित नहीं, भारतीय जनता पक्षाचे नेते, बीड नगरपरिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील, त्यांच्या पत्नी रुक्मिणीबाई नवनाथ शिराळे पाटील तसेच प्रवीण चव्हाण यांच्याविरुद्ध गेवराई शहर पोलीस ठाण्यात जमीन खरेदी–विक्री व्यवहारासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने नवनाथ शिराळे पाटील व इतरांना अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

जमीन व्यवहारासंदर्भात कृष्णा राक्षे व शुभम यांनी दिलेल्या तक्रारीवरून २३ जुलै २०२६ रोजी गेवराई शहर पोलीस ठाण्यात संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. तक्रारीमध्ये जमीन व्यवहार, कागदपत्रे तसेच रकमेच्या व्यवहारासंदर्भात आरोप करण्यात आले होते. या प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज करण्यात आला होता. मात्र, गुन्ह्याचा तपास प्राथमिक टप्प्यात असल्याचे नमूद करून तेथे जामीन अर्ज फेटाळण्यात आला. त्यानंतर नवनाथ शिराळे पाटील व इतरांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेतली.



उच्च न्यायालयात प्रभावी युक्तिवाद

उच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान बचाव पक्षातर्फे संबंधित व्यक्ती या प्रकरणातील साक्षीदारांच्या भूमिकेत असल्याचा, प्रत्यक्ष फसवणूक झाल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत नसल्याचा तसेच तक्रार विलंबाने दाखल करण्यात आल्याचा युक्तिवाद करण्यात आला. या सर्व बाबींचा विचार करून उच्च न्यायालयाने नवनाथ शिराळे पाटील व इतरांना अटकपूर्व जामीन मंजूर केला. नवनाथ शिराळे पाटील यांच्यातर्फे छत्रपती संभाजीनगर येथील अधिवक्ता चंद्रकांत ठोंबरे व अधिवक्ता प्रिया तुपे यांनी न्यायालयीन काम पाहिले. संबंधित प्रकरणात कायदेशीर बाजू प्रभावीपणे मांडण्यात आल्याचे प्रसिद्धीपत्रकाद्वारे अधिवक्ता चंद्रकांत ठोंबरे यांनी कळविले आहे.

या प्रकरणाकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले होते. अटकपूर्व जामीन मिळणार की नाही, याबाबत राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठी चर्चा सुरू होती. अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने अटकपूर्व जामीन मंजूर केल्याने शिराळे पाटील समर्थक व त्यांच्या परिचितांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

**कायदेशीर प्रक्रियेत न्यायालयाचा निर्णय महत्त्वाचा**

अटकपूर्व जामीन हा अंतिम निर्दोषत्वाचा निर्णय नसून, पुढील न्यायालयीन व तपास प्रक्रियेला सामोरे जाण्यासाठी न्यायालयाने दिलेला संरक्षणात्मक आदेश आहे. या प्रकरणातील आरोप व तपासाची पुढील दिशा न्यायालयीन प्रक्रियेत स्पष्ट होणार आहे. दरम्यान, सत्य परेशान हो सकता है, लेकिन पराजित नहीं या भूमिकेवर शिराळे पाटील समर्थकांनी समाधान व्यक्त करत उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.

## पिक विम्याच्या मागणीसाठी शेतकरी कामगार पक्षाचा मोठीवाडी फाटा येथे रस्ता रोको

### तर.. मुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांना, आमदारांना नाकाबंदी करु : गोले पाटील

**माजलगाव | शेख अखिल**

माजलगाव तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग ६१ वर मोठेवाडी फाटा येथे शेतकरी कामगार पक्षाचा पिक विम्याची १७ हजार पाचशे रूपायाची रक्कम त्वरित वाटप करा, सरसगट संपूर्ण कर्जमाफी करा, शेतकऱ्यांना हेक्टरी दोन लाख रुपये नवीन कर्ज द्या, शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या होणाऱ्या चोरीला आळा घालुन शेतकऱ्यांना एक लाख रूपये मदत करा. या मागणीसाठी १९ ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी दहा वाजता शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड. नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांसह रस्ता रोको करण्यात आला.



यावेळी आंदोलकांनी प्रचंड घोषणाबाजी करत सरकार विरोधात आक्रोश व्यक्त केला, तर भाई ड. नारायण गोले पाटील यांनी शासनाच्या धोरणाचा समाचार घेताना येणाऱ्या काळात शासनाने शेतकऱ्याच्या प्रश्नाला गांभीर्याने न घेतल्यास मुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळ आणि आमदारांना नाकाबंदी करण्याचा इशारा दिला.

यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे भाई सलीम खान पठाण, भाई राहुल सोळंके, भाई अशोक कुलकर्णी, भाई चांगदेव शेजुळ, भाई राम मस्के, भाई विष्णू शेळके, भाई श्रीराम शेवाळे, भाई चंद्रकांत खामकर, अभिषेक सोळंके, दत्ता इंगळे, राजेभाऊ घोडके, गजानन गोंडे, सुदर्शन हिवरकर, अंगद खेत्री, अशोक रासवे, रंजीत जाधव, दत्तात्रय बागल, बाबा औटे, बालासाहेब कटके, अशोक रासवे, तोफीक खान, शेख अनिस, ऋषिकेश सोळंके आदी सहभागी झाले होते. यावेळी वाहनांच्या प्रचंड रांगा लागल्या होत्या तर पोलीस प्रशासनाने प्रचंड संख्येने चोख बंदोबस्त ठेवला होता, शेवटी आंदोलकांनी मागण्याचे निवेदन मंडळ अधिकारी सानप यांना दिले असता त्यांनी तात्काळ निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना पाठवणार असल्याचे सांगितले.

## भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अभ्यासिका केंद्राची दुरवस्था

### विद्यार्थ्यांच्या सुविधांकडे नगरपंचायतीचे दुर्लक्ष

**पाटोदा | फयाज सय्यद**

विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी हक्काची जागा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने उभारण्यात आलेले भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अभ्यासिका केंद्र आजही प्रत्यक्ष उपयोगात येत नसल्याने पाटोदा नगरपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इमारत उभारून कित्येक वर्षे लोटली, मात्र विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू करण्याबाबत ठोस पावले उचलली जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.




स्पर्धा परीक्षा, MPSC, UPSC तसेच विविध शासकीय आणि खासगी परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शांत व सुरक्षित अभ्यासाची जागा मिळणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेली ही इमारत वर्षानुवर्षे वापराविना पडून असल्याचे चित्र दिसत आहे. ‘इमारत बांधली, पण विद्यार्थ्यांच्या उपयोगाची कधी?’ असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सार्वजनिक निधीतून उभारलेल्या सुविधेचा योग्य वापर न झाल्यास त्यामागील उद्देशच फोल ठरतो. इमारतीची नियमित देखभाल, आवश्यक दुरुस्ती, वीज–पाणी, फर्निचर आणि सुरक्षिततेची व्यवस्था करून अभ्यासिका तातडीने सुरू करणे अपेक्षित असताना प्रशासनाच्या उदासीनतेमुळे विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळत नसल्याची भावना आहे.

विशेष म्हणजे, इमारत दीर्घकाळ बंद व वापराविना राहिल्यास तिच्या सुरक्षिततेबाबतही प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यामुळे नगरपंचायतीने केवळ आश्वासने न देता इमारतीची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी आणि अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी सुरू करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**नगरपंचायतीने उत्तर द्यावे!**

अभ्यासिका केंद्र नेमके कधी सुरू होणार? इमारतीच्या देखभालीसाठी आतापर्यंत काय उपाययोजना करण्यात आल्या? विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा कधी उपलब्ध करून देणार? या प्रश्नांची उत्तरे पाटोदा नगरपंचायतीने नागरिकांसमोर स्पष्ट करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेली ही सुविधा वर्षानुवर्षे धूळ खात पडून राहणे ही गंभीर बाब असून, नगरपंचायतीने आता तरी झोपेतून जागे होऊन अभ्यासिका तातडीने सुरू करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांसह पालक व नागरिकांतून होत आहे.

**नगरपरिषद प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीडच्या विरोधात बसलेले राजेशकुमार जोगदंड यांचे ७ व्या दिवशीही अन्नत्याग उपोषण सुरू**

## आज टोकाची भूमिका घेणार : गौतम आगळे

**बीड | प्रतिनिधी**

रोजंदारी मजदुर सेना मराठवाडा अध्यक्ष तथा कामगार प्रतिनिधी भाई राजेशकुमार जोगदंड यांनी बीड जिल्ह्यातील घनकचरा व्यवस्थापनातील कंत्राटी कामगारांना किमान वेतन व प्रचलित कामगार कायद्याच्या सोई सवलतीचा लाभ मिळवून देण्यासाठी १५ आगस्ट २०२६ स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर अन्नत्याग उपोषणाला सुरुवात केली आहे. आज आंदोलनाचा ७ वा दिवस सुरू झाला तरी त्यांचे अन्नत्याग उपोषण सुरूच आहे, जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घेतली नाही तर आज ते टोकाची भूमिका घेतील अशी माहिती कामगार नेते तथा रोजंदारी मजदुर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.



बीड जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांच्या अधिनस्थ कंत्राटदाराकडून कंत्राटी कामगारांना किमान वेतन अधिनियम व प्रचलित कामगार कायद्याच्या सोई सवलतीचा लाभ आजतागायत मिळत नाही तो मिळावा, शासनाने वेळोवेळी काढलेल्या शासन परिपत्रक / आदेश निर्गमित केले त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करत नसल्याने त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी, या करीता अन्नत्याग उपोषण करत आहेत.

या उपोषणाची दखल भारतीय दलित पँथर चे संस्थापक अध्यक्ष मा. अंबादास शिंदे सर यांनी घेतली असून त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक निवेदन सादर करून त्याच्या प्रती संबंधित अधिकाऱ्यांना ईमेल द्वारे पाठवल्या आहेत. तसेच भारतीय दलित पँथर चे जिल्हाध्यक्ष वैजनाथ गायकवाड सर यांनी सुद्धा जाहीर पाठिंबा दिला आहे.

बीड जिल्ह्यातील सर्व कंत्राटी कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार वेतन व प्रचलित कामगार कायद्याच्या सोई सवलतीचा लाभ देण्यात यावा, तत्कालीन जिल्हाधिकारी २०१७ ते २०२६ नवल किशोर राम ते आजचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आंदोलनाच्या अनुषंगाने संयुक्त बैठकीचा सपाटा लावला तसे इतिवृत्त तयार करून संबंधित मुख्याधिकारी नगरपरिषद/ नगरपंचायत यांना निर्देश दिले तरी सुद्धा त्याची आजतागायत काटेकोरपणे अंमलबजावणी केली नाही, ती तात्काळ करावी, अशी उपोषण कर्ते भाई राजेश कुमार जोगदंड यांची मागणी आहे. ती जर पुर्ण केली नाही तर ते आज टोकाचे पाऊल उचलतील अशी माहिती संघटनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

## राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडे गेवराईच्या विविध मागण्याचे निवेदन : अनिल बोर्डे

**गेवराई | प्रतिनिधी**

गेवराई शहर व बीड जिल्ह्यातील नागरिकाच्या प्रश्नासाठी बीड जिल्हा ग्राहक पंचायत चे उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी राज्यमंत्री मा. सौ. माधुरी मिसाळ यांना ई–मेल द्वारे व पुणे येथील त्यांच्या संपर्क कार्यालयात लेखी निवेदन दिलेले आहे.

निवेदनात ४ प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. निवेदनातील प्रमुख मागण्या : ठेवीदारासाठी न्याय: बीड जिल्ह्यातील छत्रपती श्री मंगलनाथ मल्टिपल निधी आदी हजारो कष्टकरी, शेतकरी, महिला व ज्येष्ठ नागरिकाची, दिव्यांगाची रक्कम



अडकली आहे. संस्था बंद झाल्यामुळे मूळ रक्कम व व्याज मिळत नाही. त्यामुळे अनेक कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. शासनाने विशेष समिती नेमून ठेविदाराच्या रकमा मिळवून द्याव्यात. ज्येष्ठ नागरिक सभागृह व गार्ड न: गेवराई शहराची लोकसंख्या वाढत आहे. ज्येष्ठ नागरिकना भजन, व्याख्यान, योग व आरोग्य तपासणीसाठी, सांस्कृतिक आदी कामासाठी कोणतेही स्वतंत्र सभागृह नाही. नगर विकास खात्यामार्फत जेष्ठ नागरिक सभागृह व ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्यान मंजूर करावे. दुभाजकाचे काम पूर्ण करावे : गेवराई हे मुख्य मार्गावरील शहर आहे. मोठ्या प्रमाणात बसेस व रहदारी असल्यामुळे वारंवार ट्रॉफीक जाम होते. त्यामुळे शहरातील दुभाजकाचे काम तात्काळ करण्याचे आदेश निर्गमित करण्यात यावेत. तात्काळ करण्याचे आदेश परिवहन व नगर विकास खात्याने द्यावेत. बस स्थानकाचा कायापालट: गेवराई रेल्वे नसल्यामुळे बस हाच एकमेव पर्याय आहे. त्यासाठी बस स्थानक सुंदर, स्वच्छ, सुरक्षित असणे आवश्यक आहे. तसेच इलेक्ट्रिक वाहनासाठी चार्जिंग सेंटर त्वरित सुरू करावे. यावेळी बीड जिल्हा ग्राहक पंचायत चे उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी निवेदन दिले आहे की, आपण महिला व ज्येष्ठाच्या प्रश्नाबाबत संवेदनशील व जागृत आहात. तरी वरील चारही प्रश्न तात्काळ मार्गी लावून गेवराईकराना न्याय द्यावा. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगर परिषद गेवराई यांना देखील देण्यात आल्या आहेत.

## कारखानदाराचे खिसे गरम, जनतेचे बजेट नरम–हे कसले सरकार? : शेख युनूस

**बीड | प्रतिनिधी**



२० दिवसात साखर ४२ वरून ७० रुपयावर गेली, सरकार साठेबाजाच्या दावणीला आहे का ? असा थेट आरोप सरकारवर सामाजिक कार्यकर्ता तथा पत्रकार शेख युनुस यांनी केला आहे. पुढे ते म्हणाले की, सणासुदीच्या तोंडावर सर्वसामान्यांच्या घरात गोडधोड व्हायच्या ऐवजी सरकारने महागाईचा कडू घास भरवला आहे. एकीकडे कारखानदार, मोठे व्यापारी आणि साठेबाजाचे खिसे गरम होत आहे. तर दुसरीकडे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबाचे महिन्याचे बजेट पूर्णपणे नरम, कोलमडून गेले आहे.

बाजारात साखरेची अजिबात कमतरता नाही. साखर कारखान्यांमध्ये लाखो क्विंटल साखर पडून आहे. पण जाणीवपूर्वक बाजारात माल कमी सोडला जात आहे. कृत्रिम टंचाई दाखवून दर वाढवले जात आहेत. आणि सरकारचे अन्न व नागरी पुरवठा विभाग फक्त बघायची भूमिका घेत आहे, असा थेट आरोप शेख युनूस यांनी केला. जर सरकार सर्वसामान्याचे असेल तर कारवाई का होत नाही? साठेबाज व्यापारांच्या गोदामावर छापे का पडत नाहीत? निवडणुकीत देणगी देणाऱ्या कारखानदारांना खुश करण्यासाठी तर ही दरवाढ नाही ना? ते म्हणाले, हे सर्वसामान्याचे सरकार नाही, हे साखर कारखानदाराचे आणि साठे बाजाराचे सरकार आहे. २५ रुपयाची थेट लूट सुरू आहे. एक किलो मागे २५ रुपये जास्त म्हणजे, एका पोत्यामागे २५०० रुपये. कोट्यावधीची लूट. सरकारने तात्काळ साखरेचे भाव कमी करावे, अन्यथा जनता सरकारला धडा शिकवल्याशिवाय गप्प राहणार नाही. सरकारने गरिबाच्या चहातली साखर काढून स्वतःच्या पायावर दगड मारून घेण्याचे काम केले आहे. याचे परिणाम सरकारला भोगावे लागेल.

साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. *वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no,1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com